सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २४ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २७० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## बंडाच्या पवित्र्यातील भुजबळांना मुख्यमंत्र्यांचा सबुरीचा सल्ला; सागर बंगल्यावर ४० मिनिटे 'गुफ्तगु'

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई , दि.२३ डिसेंबर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रिमंडळात तावळल्याने नाराज असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सागर बंगल्यावर पुतणे पुतणे समीर भुजबळ यांच्यासह जवळपास ४० मिनिटे नाराजीसह आपल्या व्यथा मांडल्या. पक्षप्रमुख पवार व अन्य नेत्यांना न भेटता त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडेच गाराने मांडल्याने राजकीय चर्चांना ऊत आला आहे त्यातून राष्ट्रवादीतून बाहेर पडण्याचा त्यांचा इरादा स्पष्ट झाला आहे.मात्र मुख्यमंत्र्यांनी त्यांना

### अजितदादांना त्यांना राष्ट्रीय पातळीवर जबाबदारी द्यायची आहे: मुख्यमंत्री

भुजबळांची आपली सविस्तर चर्चा झाली असून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आहे अजित पवार यांना राष्ट्रीयस्तरावर जबाबदारी द्यायची आहे .याबाबत चर्चा करून येता काही दिवसात समाधान करून तोडगा काढला जाईल, भाजपात येण्यासाठी काही मागणी केली नाही,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### आमचा पक्षांतर्गत प्रश्न आहे : अजित पवार

छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री यांची भेट घेतल्याने ते भाजपात प्रवेश करणार अशी चर्चा सुरू झाली आहे त्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे विचारणा केल्यास त्यांनी हा आमचा पक्षांतर्गत प्रश्न आहे आम्ही तो सोडवू इतकेच उत्तर दिले.

आठ ते दहा दिवस सबुरी बाळगा, असा सल्ला दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळण्यात ओबीसी समाजाचा मोठा हातभार आहे, सरकार समाजावर अन्याय होऊ देणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांनी आपल्याला ग्वाही आश्वासन दिले असल्याचे भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मंत्रिमंडळ विस्तारात डावल्याने भुजबळ यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे .राज्यात ठिकठिकाणी ओबीसी समाजाचे मेळावे घेऊन ते पुढील भूमिका निश्चित करणार आहेत. ते सातत्याने अजित पवार यांच्यावर टीका करत असल्याने ते राष्ट्रवादीतून बाहेर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर त्यांनी सकाळी साडे दहाच्या सुमारास मुख्यमंत्री फडणवीस यांचे निवासस्थान असलेल्या सागर बंगला गाठला. पुतणे समीर भुजबळ यांच्यासमवेत त्यांनी आपल्या व्यथा त्यांच्यासमोर मांडल्या. त्यांना भेटून आल्यानंतर त्यांच्याशी सामाजिक आणि राजकीय विषयांवर चर्चा केली असल्याचे सांगून भुजबळ म्हणाले की, फडणवीस यांनी निवडणुकीत जो महाविजय झाला यात ओबीसी समाजाचे मोठे पाठबळ मिळाले असून त्याबद्दल आभार मानत त्यांनी ओबीसींचे नुकसान होऊ देणार नाही. याबाबत मी काळजी घेणार आहे. राज्यात जे काही सुरू आहे, त्यामुळं मला आठ , दहा दिवस द्या. त्यानंतर आपण पुन्हा भेटू आणि निश्चितपणे काहीतरी चांगला मार्ग यातून काढू, असे आश्वासन त्यांनी दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांनी जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणे बंद करावे : खा. वर्षा गायकवाड

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २३ डिसेबर : परभणीतील घटनेनंतर महायुती सरकारचे मंत्री सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियांची भेट घेतात त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यात राजकारण दिसत नाही. उपमुख्यमंत्री अजित पवारांनी सोमनाथ सूर्यवंशींच्या कुटुंबाला भेट दिली ते राजकारण नव्हते का? असा प्रश्न विचारून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुर्यवंशींच्या कुटुंबाची भेट घेतली तर ती राजकीय भेट व जातीजातीत द्वेष पसरवण्यासाठी कशी होते? मुख्यमंत्री फडणवीस यांचा हा दुटप्पीपणा आहे, असे प्रत्युत्तर मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी सोमवारी दिले.

फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या परभणी भेटीवर केलेल्या टीकेचा समाचार घेत त्या म्हणाल्या की, ' सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमनाथ सुर्यवंशींच्या पोस्टमॉर्टम रिपोर्टकडे दुर्लक्ष केले. सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस मारहाणीत झालेला आहे, त्यांना अनेक जखमा झाल्या होत्या अशा पोस्टमार्टेम अहवालात म्हटले आहे. त्याला कोणताही आजार नव्हता ,असे सूर्यवंशी कुटुंबाचे म्हणणे आहे परंतु मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सोमनाथला श्वसनाचा आजार होता अशी खोटी माहिती देऊन राजकीय पळवाट काढली आणि खऱ्या गुन्हेगारांवर अद्याप कारवाई केली नाही, असे सांगून त्या म्हणाल्या की,एका पीडित कुटुंबाला आधार देणे ही माणुसकी आहे. दलित, बहुजनांच्या न्यायासाठी राहुल गांधी नेहमीच उभे राहिले आहेत. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी काँग्रेस सर्वतोपरी प्रयत्न करेल, पण युती सरकार खोटे बोलून एका आईच्या दुःखात अधिक भर घालत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा द्यावी. लोकांच्या डोळ्यात धूळ फेकणे आणि मूळ विषयापासून भरकटवणे बंद करण्याचा सल्लाही दिला.

## गांधी यांच्याद्वारे वाकोडे कुटूंबियांचे सांत्वन

परभणी,दि.२३(प्रतिनिधी) : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी (दि.२३) सव्वा तीन वाजता आंबेडकरी चळवळीतील अग्रगणी ज्येष्ठ नेते स्व. विजय वाकोडे यांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले.



खासदार गांधी यांनी सोमवारी दुपारी २.२० वाजता नांदेडहून परभणीत दाखल झाल्याबरोबर नवा मोंढ्यांतील स्व. सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले. त्या पाठोपाठ आंबेडकरी चळवळीतील अग्रगणी ज्येष्ठ नेते स्व. वाकोडे यांच्या राहुल नगरातील निवासस्थानी रवाना होवून वाकोडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली. पाठोपाठ निवासस्थानी कुटूंबियातील सदस्यांबरोबर हितगुज सुरु केले. त्यावेळी कुटूंबियातील सदस्य व काही मोजके नेते उपस्थित होते. वाकोडे कुटूंबियांनी १० डिसेंबर रोजीच्या संविधानाच्या विटंबनेची दुर्देवी घटना, त्याच दिवशी वाकोडे यांनी स्वयंस्फूर्तीने शांततेकरीता केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. जिल्हा बंदच्या दरम्यानसुध्दा वाकोडे यांची सकारात्मक भूमिका विशद करतेवेळी तरीसुध्दा पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. त्यामुळेच ते मोठ्या तणावाखाली होते, त्या ताण-तणावाखालीच वाकोडे यांची प्रकृती बिघडली व मृत्यू झाला, असे म्हटले. जिल्हा महसूल व पोलिस प्रशासनाने एकंदरीत या घटनांच्या पार्श्वभूमीवर केलेल्या अमानुष कारवाया तसेच राज्य सरकारने घेतलेल्या चुकीच्या भूमिकांबद्दल तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली.

दरम्यान, गांधी यांनी वाकोडे कुटूंबियांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर त्यांचे आंबेडकरी चळवळीतील एकूण योगदान हे निश्चितच अमूल्य होते. जातीय सलोखा रहावा, शांतता रहावी यासाठी या ज्येष्ठ नेत्याने सुरु केल्या प्रयत्नांची दखल घेण्याऐवजी वाकोडे यांना या घटनाक्रमात आरोपी ठरविण्याचे प्रशासन व सरकारची कृती ही दुर्देवी बाब आहे, असे मत व्यक्त केले. परभणीतील एकूण घटनाक्रम, दुर्देवी प्रकाराबाबत आपण सरकारला जाब विचारु, तसेच वाकोडे कुटूंबियांनासुध्दा न्याय मिळवून देवू, असा विश्वास गांधी यांनी दिला. यावेळी पत्नी श्रीमती अलकाताई विजय वाकोडे, मुलगा आशिष वाकोडे, सिद्धांत वाकोडे, मुलगी प्रियांका वाकोडे, सुप्रिया पोपटकर, विशाखा ढाले, सून शितल वाकोडे तसेच बंधू सुरेश वाकोडे यांच्यासह परिवारातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चिन्नीथाल, प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे नेते विजय वडेवट्टीवार, बाळासाहेब थोरात, खासदार वर्षा गायकवाड, श्रीमती यशोमती ठाकूर, खासदार प्रणिती शिंदे, खासदार संजय जाधव, काँग्रेसचे नेते तथा जिल्हाध्यक्ष सुरेश वरपूडकर, काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ हत्तीअंबीरे, माजी आमदार सुरेश दादा देशमुख, माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे, बाळासाहेब देशमुख, नदीम इनामदार, रवि सोनकांबळे, अमोल जाधव, सुनील तुरुकमाने आदी उपस्थित होते.




## संतोष देशमुख हत्या प्रकरणी ,२८ डिसेंबरला बीडमध्ये मोर्चा; सकल मराठा समाजाचा इशारा

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई ,दि.२२ डिसेंबर : सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी होऊन मुख्य सुत्रधारासह सर्व आरोपींना अटक करावी ,या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने २८ डिसेंबरला बिड जिल्हाधिकारी कार्यालयवर मोर्चा काढण्यात येणार आहे.

अशी माहिती मराठा समाजाचे नेते अंकुश कदम व नरेंद्र पाटील यांनी सोमवारी मुंबईत पत्रकार परिषदेत दिली.



राज्यात सध्या सर्वत्र चर्चेचा विषय बनलेल्या संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलीस नि:पक्षपातीपणे तपास करत नाही, त्यामुळे, समाजात तीव्र भावना निर्माण झाले आहेत,. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सकळ मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या नेत्यांना आंदोलनाचा इशारा दिला असून मारेक-यांना कठोर शिक्षा होत नाही तसेच राजकीय वरदहस्त असणा-या नेत्याची हकलपट्टी होत नाही तो पर्यंत आंदोलन सुरूच राहणार असे कदम यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माजी आमदार नरेंद्र पाटील,रघुनाथ पाटील, महेश डोंगरे ,धनंजय जाधव आदी मराठा समाजाचे नेते उपस्थित होते. बिड जिल्ह्याचा बिहार होऊ नये व संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्री पदावरून काढून टाकावे.

मुंडे यांच्या जवळचा वाल्मिकी कराड यांच्यावर ३०२ अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करुन तातडीने त्याला अटक करावी, अशी मागणी त्यानी यावेळी केली.

## विनोद कांबळीची प्रकृती पुन्हा खालावली, रुग्णालयात दाखल

ठाणे : भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू विनोद कांबळी याची प्रकृती पुन्हा एकदा खालावली आहे. त्याला ठाणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विनोद कांबळीची काळजी घेण्यासाठी डॉक्टरांचे पथक कार्यरत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कांबळीची प्रकृती सध्या स्थिर आहे.



काही दिवसापूर्वी रमाकांत आचरेकर स्मारकाच्या उद्घाटन कार्यक्रमाला विनोद कांबळी उपस्थित होता. या कार्यक्रमाला सचिनही उपस्थित होता. सचिन आणि कांबळीचा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप चर्चेत होता. कांबळी हा गंभीर आजाराने त्रस्त आहे. त्याच्या व्यसनाधीनतेमुळे त्याला खूप त्रास होत आहे. यासाठी तो अनेकवेळा पुनर्वसन केंद्रातही गेला आहे.

हृदयविकारासोबतच कांबळी इतर समस्यांमधूनही जात आहे. यापूर्वीही त्याची प्रकृती खालावली होती. आता पुन्हा एकदा त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या तो डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहे. जर सर्व काही ठीक झाले तर त्याला लवकरच डिस्चार्ज मिळेल. मात्र याबाबत अधिकृत माहिती अद्याप आली नाही.

## महसूल मंत्री बावनकुळेंना रामटेक; धनंजय मुंडेंना सातपुडा तर राम शिंदेंचे ज्ञानेश्वरीत असणार वास्तव्य!

### ३१ मंत्र्यांना बंगले, फ्लॅटचे वाटप

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि.२३ डिसेंबर : महायुती सरकारमधील मंत्र्यांचे खातेवाटप झाल्यानंतर सरकार क्शन मोडवर आले आहे सोमवारी३१ मंत्र्यांच्या दालनाचे आणि निवासस्थानाचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना रामटेक हा बंगला तर सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या धनंजय मुंडे यांना सातपुडा बंगला मिळाला आहे.

विधान परिषदेचे नूतन सभापती, राम शिंदे यांना ज्ञानेश्वरी बंगला देण्यात आला असून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना शिवगिरी बंगल्याची चावी मिळाली आहे.

महायुतीच्या ३१ मंत्र्यांच्या निवासस्थानाचे वाटप करण्यात आले असून अनेकांची फ्लॅटमध्ये वर्णी लावण्यात आले आहे. मागच्या सरकारमध्ये मंत्री असलेल्यांची निवासस्थाने तीच ठेवण्यात आली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार राधाकृष्ण विखे-पाटील यांना रॉयलस्टोन, पंकजा मुंडें यांना पर्णकुटी, शंभूराज देसाईं यांना मेघदूत तर गणेश नाईक यांना पावनगड बंगला देण्यात आला आहे.

धनंजय मुंडे यांना सातपुडा, चंद्रकांत पाटील यांना सिंहगड बंगला देण्यात आला आहे. हसन मुश्रीफ (क-८) विशाळगड, गिरीश महाजन सेवासदन, गुलाबराव पाटील जेतवन, गणेश नाईक ब-४ पावनगड , दादा भुसे ब-३ जंजीरा, संजय राठोड शिवनेरी, मंगलप्रभात लोढा ब-५ विजयदुर्ग, उदय सामंत मुक्तागिरी, जयकुमार रावल चित्रकूट, पंकजा मुंडे पर्णकुटी, अतुल सावे अ-३ शिवगढ़, अशोक उईके अ-९ लोहगड, शंभूराजे देसाई मेघदूत, आशिष शेलार व-२ रत्नसिषु, दत्तात्रय भरणे ब-६ सिध्दगड, अदिती तटकरे अ-५ प्रतापगड, शिवेंद्रराजे भोसले ३-७ पन्हाळगड, माणिकराव कोकाटे अंबर-२७, जयकुमार गोरे क-६ प्रचितीगड, नरहरि झिरवाळ सुरुचि ०९, संजय सावकारे अंबर-३२, संजय शिरसाठ अंबर-३८, प्रताप सरनाईक अर्वतो-५, भरत गोगावले सुरुचि ०२, मकरंद पाटील सुरुचि-०३.




### सरसंघचालक डॉ. मोहन भागवत बुधवारी चंद्रपूरात

चंद्रपूर, २३ डिसेंबर : मागील २९ वर्षापासून विद्यार्थ्यांमध्ये सैनिकी मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या सन्मित्र सैनिकी विद्यालयाचा वार्षिकोत्सव बुधवार दि. २५ डिसेंबर २०२४ ला शाळेच्या परिसरात आयोजित होणार आहे. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांची तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ परमानंद अंदनकर व सन्मित्र मंडळाचे सचिव अँड. निलेश चोरे यांची उपस्थिती राहणार आहे अशी माहिती प्राचार्य अरुंधती कावडकर यांनी सैनिकी शाळा येथे सोमवारी(दि २३) पत्रकार परिषदेत दिली.

## अर्थसंकल्पाच्या दिवशी शेअर बाजार सुरू राहणार

मुंबई, २३ डिसेंबर : केंद्रीय अर्थसंकल्पाच्या दिवशी १ फेब्रुवारी २०२५ रोजी शेअर बाजार सुरू राहणार आहे. भारतीय शेअर बाजार निर्देशांक (एनएसई) आणि मुंबई शेअर बाजार निर्देशांक (बीएसई) नियमीत वेळेनुसार सुरू राहणार आहेत. साधारणतः शनिवारी आणि रविवारी शेअर बाजार बंद राहतात. परंतु, अर्थसंकल्पाच्या दिवशी शनिवार असूनही बाजार नियमित वेळेनुसार लाईव्ह ट्रेडिंग सत्र करणार आहेत. अर्थसंकल्पातील घोषणांवर गुंतवणूकदारांकडून वेळेवर प्रतिसाद मिळणे, हा यामागील उद्देश आहे.



यासंदर्भात एक्सचेंजने जारी केलेल्या परिपत्रकानुसार केंद्रीय अर्थसंकल्पाच्या सादरीकरणाच्या दिवशी १ फेब्रुवारी २०२५ रोजी थेट ट्रेडिंग सत्र आयोजित केले जाईल. सेटलमेंटच्या सुट्टीमुळे १ फेब्रुवारी २०२५ रोजी 'ढ०' सत्र ट्रेडिंगसाठी शेड्यूल केले जाणार नसल्याचे एनएसईने नमूद केले आहे. इक्विटी मार्केटमध्ये दुपारी ३.३० वाजेपर्यंत नियमित ट्रेडिंग सत्र असणार आहे. तर कमोडिटी डेरिव्हेटिव्ह मार्केटमध्ये संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सत्र असेल. यपूर्वी देखील अशा हाय- इम्पॅक्ट इव्हेंटच्या पार्श्वभूमीवर शेअर बाजार खुला ठेवण्यात आला होता. उल्लेखनीय बाब म्हणजे, २०२० आणि २०१५ मध्ये देखील शनिवारी अर्थसंकल्प सादर झाला होता आणि तेव्हा देखील ट्रेडिंग सत्र आयोजित करण्यात आले होते. अर्थसंकल्पाचा दिवस हा शेअर बाजारासाठीदेखील महत्त्वाचा मानला जातो. कारण केंद्रीय अर्थसंकल्पातून सरकारची आर्थिक धोरणे, कर आकारणी आणि क्षेत्रनिहाय निधीच्या वाटपाची रूपरेषा जाहीर केली जाते. याचा उद्योग आणि गुंतवणूकदारांच्या भावनांवर लक्षणीय परिणाम होऊ शकतो.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारी २०२५ रोजी २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. अर्थमंत्री म्हणून सीतारामन यांचे हे सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादरीकरण असेल. अर्थमंत्री आणि त्यांच्या टीमने अर्थसंकल्प २०२५ ची तयारी सुरु केली आहे.

# २९ वर्षीय इसम बेपत्ता, पत्नीने घेतली पोलिसांत धाव



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२३ डिसेंबर - तालुक्यातील नागद येथील २९ वर्षीय इसम बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नागद येथून २९ वर्षीय इसम कैलास अंबर चौधरी दि २० रोजी आपल्या पत्नीला सांगून केला की मी चाळीसगांव येथे दुरुस्तीला टाकलेला मोबाईल फोन घेऊन येतो असे म्हणून तो इसम घरातून गेला रात्री उशिरापर्यंत वाट बघून न तो इसम घरी परत आला नाही पत्नीने नातेवाईक, मित्र,सगळीकडे शोध घेतला असता पती मिळून न आल्याने अखेर पत्नीने पोलिसांत धाव घेतली आणि दि.२३ सोमवार रोजी पती बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांना दिली,

कैलास चौधरी आणि त्यांची पत्नी ३ महिन्यांपूर्वी पत्नीच्या माहेरी नागद येथे वास्तव्यास आले होते,ते मूळचे निळगव्हान ता. मालेगाव जि. नाशिक येथील रहिवासी असून मोलमजुरीसाठी पत्नीच्या गावी कुटूंबासह आले होते, पत्नी सुनीता कैलास चौधरी यांच्या फिर्यादीवरून कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये बेपत्ता असल्याची नोंद घेण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल आर.यु.बोंद्रे हे करत आहे

कैलास यांचे वर्णन १) चेहरा लाबट २) केस काळे, ३) गोरा काळा सावळा, ४) शरीर बांधा सडपातळ ५) डाव्या हातावर साई बाबाचे (टॉटु) गोंदलेले, ६) पोशाख पाढरा शर्ट निळ्या रंगाची पँन्ट,७) उंची ५ फुट ३इंच ८) पायात सँडल चप्पल, ९) भाषा मराठी, तिरमली अशा वर्णनाचा इसम आढळून आल्यास कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन येथे ०२४३५-२२१०४५ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन पोलिस हेडकॉन्स्टेबल आर.यु.बोंद्रे यांनी केले आहे

## मुंबई बोट दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांना मोरारी बापूंची श्रद्धांजली आणि कुटुंबीयांना मदत

मुंबई - दोन दिवसांपूर्वी मुंबईत होडी अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथून काही पर्यटक बोटीने एलिफंटा लेणीकडे जात होते. दरम्यान, भारतीय नौदलाची स्पीड बोट पर्यटकांच्या बोटीला चुकून धडकली. दोन्ही बोटींमध्ये सुमारे ६० जण होते. या अपघातात १५ जणांना जीव गमवावा लागला. प्रसिद्ध अध्यात्मिक नेते मोरारी बापू यांनी अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. आदरणीय बापूंनी प्रत्येकी १५,००० रुपयांची आर्थिक मदत, म्हणजे एकूण २,२५,००० रुपये त्यांच्या कुटुंबियांना समर्पित केले आहेत. मुंबईस्थित रामकथेचे श्रोते श्री प्रवीणभाई तन्ना यांच्यामार्फत ही रक्कम पीडित कुटुंबांना सेवा म्हणून दिली जाणार आहे. आदरणीय मोरारी बापू यांनी या घटनेतील मृतांच्या आत्म्याला शांती मिळावी आणि त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले आहे.

## अतुल मलिकराम यांना कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी, यूएसए कडून मानद डॉक्टरेट मिळाली

नवी दिल्ली: देशातील सर्वोच्च राजकीय रणनीतीकारांपैकी एक अतुल मलिकराम यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी आणि कौशल्याबद्दल कॅलिफोर्निया पब्लिक युनिव्हर्सिटी, यूएसए द्वारे डॉक्टर ऑफ पॉलिटिकल सायन्स - स्पेशलायझेशन इन पॉलिटिकल स्ट्रॅटेजी ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. . मलिकराम यांना त्यांच्या विशेष संशोधन इव्हॉल्यूशन ऑफ पॉलिटिकल पार्टीज: मॅनिफेस्टेशन इन हिंदी हार्टलँड आफ्टर इमर्जन्सी या आधारे ही पदवी देण्यात आली. या संशोधनात त्यांनी आणीबाणीनंतर (१९७५-७७) राजकीय पक्षांचे बदलते स्वरूप, त्यांची विचारधारा आणि हिंदी भाषिक भागातील निवडणूक रणनीती यांचे विश्लेषण केले आहे. नवी दिल्लीतील पंचतारांकित जेपी सिद्धार्थ हॉटेलमध्ये झालेल्या दीक्षांत समारंभात हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी आनंद व्यक्त करताना अतुल मलिकराम म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी केवळ अभिमानाचाच नाही, तर मला राजकीय रणनीतीच्या क्षेत्रात अधिक समर्पण आणि नवीन कल्पना घेऊन काम करण्याची प्रेरणा मिळते माझ्यासह ज्या सहकाऱ्यांनी हा प्रवास शक्य केला.

## विवो ने 'वीवो इग्नाइट ने टेक्नोलॉजी और इनोवेशन इनिशिएटिव ' ची तिसरी आवृत्ती लाँच केली

नवी दिल्ली - विवो या नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँडने त्याच्या प्रमुख सीएसआरकार्यक्रम वीवो इग्नाइट ने टेक्नोलॉजी और इनोवेशन इनिशिएटिव ची तिसरी आवृत्ती जाहीर केली आहे. भारतातील तरुणांना सशक्त बनवण्याच्या आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीला चालना देण्याच्या वचनासह, या उपक्रमाचा उद्देश देशभरातील इयत्ता ८-१२वीच्या विद्यार्थ्यांना टेक-चालित नवोपक्रमाद्वारे सामाजिक आव्हाने सोडवण्यासाठी प्रेरित करण्याचा आहे. सॉफ्टवेअर-टेक इनोव्हेशन, ग्रीकल्चर आणि क्लायमेट चेंज, कम्युनिटी डेव्हलपमेंट इनोव्हेशन्स यासह विविध थीम्स अंतर्गत विद्यार्थ्यांना वैयक्तिकरित्या किंवा गटांमध्ये सादर करण्याची संधी असेल. ही स्पर्धा शाश्वत विकासासाठी आहे उद्दिष्टांशी संबंधित उद्दिष्टांवर आधारित असावे. हे तीन टप्प्यांत होईल आणि ८ जून २०२५ रोजी ग्रँड फिनालेने समारोप होईल. उत्कृष्ट १० प्रोटोटाइप अंतिम फेरीत सादर केले जातील, जे ग्रँड ज्युरी द्वारे पुरस्कृत केले जातील. विजेत्यांना शिष्यवृत्ती आणि एकूण ३५ लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे जिंकण्याची संधी मिळेल*.

## किसको था पता':झी सिनेमा वाहिनीवर

हृदयाला भिडणाऱ्या, तीव्रता असलेल्या आणि प्रेम आणि नियतीच्या सीमांना आव्हान देणाऱ्या कथेमध्ये, झी सिनेमा आपल्या प्रेक्षकांसाठी 'किसको था पता'चा खास प्रीमियर घेऊन येत आहे. 'शादी में जरूर आना' आणि 'मिडल क्लास लव्ह' अशा प्रेक्षकांनी पसंत केलेल्या चित्रपटांसाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रसिद्ध दिग्दर्शक रत्ना सिन्हा आपल्यासाठी 'किसको था पता' घेऊन येत आहेत. संपूर्ण कुटुंबाला आवडेल असा हा चित्रपट असून यात अशनूर कौर, अक्षय ओबेरॉय आणि आदिल खान असे अनेक कलाकार आहेत. या ख्रिसमसला प्रेम, उत्कटता आणि ध्यासाच्या या प्रवासाला जाण्यासाठी सज्ज व्हा 'किसको था पता' सोबत प्रदर्शित होत झी सिनेमा वाहिनीवर बुधवार, २५ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजता.

## राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे २७ डिसेंबर रोजी आयोजन

अहिल्यानगर, दि.२३ - राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त २७ डिसेंबर रोजी अहिल्यानगर तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता जिल्हास्तरीय राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. यानिमित्ताने आयोजीत या कार्यक्रमास ग्राहक चळवळीशी संबंधित कार्यकर्ते, नागरिकांनी उपस्थित राहून ग्राहक चळवळीशीसंदर्भात शासन स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे.



## मुरलीधर आसाराम खंडागळे यांचे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २३ डिसेंबर : शेकटा येथील धनगर गल्ली मधील रहिवासी मुरलीधर आसाराम खंडागळे रा शेकटा ता पैठण यांचे वय ८५ दि. २३ सोमवार रोजी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी दुःखद निधन झाले त्यांच्या पार्थिवावर दुपारी बारा वाजता शेकटा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात एक मुलगा दोन मुली जावई तीन नातवंड असा परिवार आहे.

# विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांच्याकडून प्रशासकीय कामकाजाचा आढावा

### विविध योजनांचे अभिसरण करून आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्यावर भर द्या- डॉ.गेडाम



अहिल्यानगर दि.२३ - जिल्हा विकास आराखड्याबाबत जिल्हा वार्षिक योजनेतील राखीव निधीचा विनियोग करताना विविध योजनांचे अभिसरण करून आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्यावर भर द्यावा आणि विकास आराखड्यात रोजगार निर्मिती करणाऱ्या प्रकल्पांवर भर द्यावा, अशा सूचना नाशिक विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरिकर, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी शाहुराज मोरे, जिल्हा मृद व जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसामुद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ.गेडाम यांनी जिल्हा विकास आराखड्याच्या नियोजनाबाबत आढावा घेतला. ते म्हणाले, जिल्ह्याच्या विकासाला चालना देणाऱ्या कामांचा प्राधान्याने विचार व्हावा. विविध योजनांच्या अभिसरणाद्वारे विकासाचे नियोजित उद्दिष्ट पूर्ण होईल आणि त्या भागातील नागरिकांना त्याचा लाभ मिळेल याचा विचार विकास आराखड्यात असावा. त्यासाठी प्राधान्याच्या विशिष्ट विकास प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून त्यासाठी आवश्यक सुविधा उभाराव्यात.

विविध शासकीय,अशासकीय संस्थांची मदत घेऊन कृषी आणि दुग्ध व्यवसाय आधारित क्लस्टरमधून निर्यात करण्याबाबत शक्यतांचा विचार व्हावा. अशा क्लस्टरच्या विकासासाठी अपेक्षित सुविधा उभारण्यावर भर द्यावा. एखाद्या क्षेत्राचा विकास करताना त्यासाठी आवश्यक अत्याधुनिक सुविधांचा विकास करण्याकडे अधिक लक्ष द्यावे.

जिल्ह्यातील पर्यटन विकासाचा विचार करताना तेथील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर द्यावा. ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून बचत गटाच्या महिलांना टुरिस्ट गाईडचे प्रशिक्षण देण्यात यावे, असेही डॉ. गेडाम म्हणाले.

डॉ.गेडाम यांनी यावेळी जिल्ह्यातील जलसंधारण कामांचा आढावा घेतला. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून गाव जल परिपूर्ण करण्यासाठी पुढील ३० वर्षाचे नियोजन करा, त्यासाठी सूक्ष्म नियोजनावर भर द्यावा. गावाच्या पाण्याची गरज लक्षात घेण्यासोबत नदी किंवा नाला प्रवाहितही राहील याचाही विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी सालीमठ यांनी सादरीकरणाद्वारे जिल्हा विकास आराखड्याबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील विकासाचे सूक्ष्म नियोजन करण्यात येऊन प्राधान्याने श्री.गायसामुद्रे यांनी जलसंधारण योजनांचा आढावा सादर केला.

यावेळी जिल्हा विकास आराखडा, जलयुक्त शिवार योजना , गाळमुक्त धारण गाळयुक्त शिवार, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, अमृत सरोवर अभियान आदी योजनांचा आढावा घेण्यात आला.

## 'श्रद्धाभूमी ते प्रगटभूमी' संत श्री. गजानन महाराज ( शेगाव ) दिंडीचे सिल्लोड शहरात आगमन



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.२४, 'श्रद्धाभूमी ते प्रगटभूमी' संत श्री. गजानन महाराज ( शेगाव ) दिंडीचे सिल्लोड शहरात सोमवार रोजी सायंकाळी आगमन झाले होते. शहरातील प्रियदर्शनी चौकात भविकभक्तांनी दिंडीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. शिवसेना नेते , माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार देखील याप्रसंगी उपस्थित होते. त्यांनी दिंडीतील भाविकांशी संवाद साधत दिंडीचे स्वागत केले.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल यांच्यावतीने दिंडीतील भाविकांसाठी दरवर्षीप्रमाणे भोजन व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. गेल्या १६ वर्षांपासून या दिंडीची परंपरा कायम असून प्रत्येक वेळी दिंडीचा मुक्काम सिल्लोड शहरात असतो. छत्रपती संभाजीनगर ते शेगाव असे 'श्रद्धाभूमी ते प्रगटभूमी' असा या दिंडीचा प्रवास असणार आहे.

यावेळी दिंडी प्रमुख डॉ.प्रवीण वक्ते, पोपट महाराज फरकाडे दत्तात्रय आपळे, प्रशांत लाखे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, सुदर्शन अग्रवाल, डॉ. मच्छींद्र पाखरे, नॅशनल सह. सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, दत्तात्रय शेजुळ, राजेंद्र ठोंबरे, आत्माराम अग्रवाल, प्रशांत क्षीरसागर, राजू गौर, विजय खाजेकर, दत्तात्रय भवर , सुभाष लोणकर, माजी नगरसेविका रेखाबाई अग्रवाल आदिंसह भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## हयात प्लेस तुमच्या ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी सर्वोत्तम पर्याय

छत्रपती संभाजीनगर: ऐतिहासिक 'सिटी ऑफ गेट्स' च्या मध्यभागी वसलेले हॉटेल हयात प्लेस औरंगाबाद विमानतळ हे आधुनिक डिझाइन आणि समृद्ध वारसा, सुविधा आणि आराम यांचे उत्कृष्ट मिश्रण आहे. त्यामुळे हॉटेल हयात प्लेस औरंगाबाद विमानतळ तुमच्या ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी सर्वोत्तम पर्याय आहे. हॉटेल हयात हे ठिकाण छ. संभाजी नगर मधील बीबी का मकबरा तसेच अजिंठा आणि एलोरा लेण्यांच्या युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांवर सहज प्रवेशासह नवीन अनुभवांचे प्रवेशद्वार आहे. आगामी सणांच्या हंगामासाठी एक परिपूर्ण ठिकाण असून, येथे तुम्ही झिंग-वर्ल्ड ऑफ फ्लेवर्समधील प्रत्येक पॅलेटसह मनमोहक आनंद अनुभवू शकता. याशिवाय फिटनेस सेंटर आणि स्विमिंग पूल, शहराचा शोध घेण्यासाठी किंवा व्यस्त दिवसानंतर आराम करण्यासाठी हॉटेल आदर्श ठिकाण आहे. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सणांसाठी हॉटेल हयात प्लेस औरंगाबाद अनेक रोमांचक उपक्रम आणि पाहुण्यांना आनंद देण्यासाठी खास ऑफर देणार आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर न्यायालय गंगापूर ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर सिव्हिल एम.ए.क. ४६७/२०२४**

अर्जदार : १. संगीता संताराम साळुंके, वय. ४८ वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा. मालुंजा खुर्द, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २. निलेश संताराम साळुंके, वय. २८ वर्षे, धंदा-शेती, रा. मालुंजा खुर्द, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी मयत संताराम पंढरीनाथ साळुंके यांचे वारस असल्याबाबत प्रकरण या मा. न्यायालयात त्यांचे विधीज्ञ अविनाश चव्हाण यांच्या मार्फत दाखल केला असून अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार नं २ चे वडील मयत संताराम पंढरीनाथ साळुंके हे. दि. १०/१२/२०२३ रोजी मालुंजा खुर्द ता. गंगापूर येथे मयत झालेले आहे. गयत संताराम पंढरीनाथ साळुंके यांना अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारसदार नाही. अर्जदारांना शासकीय तसेच निमशासकीय कामासाठी त्याची आवश्यकता आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, अर्जदार हे मयत संताराम पंढरीनाथ साळुंके यांचे कायदेशीर वारसदार आहे व त्याप्रमाणे त्याचे वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदारांचे हक्कात जारी करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे. तरी सदरील मागणीस कुणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधीज्ञामार्फत न्यायालयात आक्षेप नोंदवावा मुदतीत आक्षेप न असल्यास न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे आदेश पारित करेल. पुढील तारीख २९/१/२०२५

आदेशावरून

सहायक अधिक्षक न्यायलय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२२/२०२४.

१. भगवान पंढरी मानकर, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर, २. वसंत पंढरी मानकर मयत-तर्फे वासर I) मंगला वसंत मानकर, वय ४४ वर्षे, धंदा नोकरी, रा. वरीलप्रमाणे. II) शुभम वसंत मानकर, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत पंढरी नारायण मानकर यांचा दिनांक ०९/०५/२०२० रोजी जामनेर ता. जामनेर, जि. जळगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत पंढरी नारायण मानकर यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दिनांक १८/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु.ता. ३०/०१/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२०/२०२४.

अर्जदार : १. वामनराव शामराव रोकडे, वय ७४ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, रा. सोयगांव, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. माधवराव शामराव रोकडे मयत-तर्फे वासर i) सुमनबाई माधवराव रोकडे, वय ७३ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे. ii) भगवान माधवराव रोकडे, वय ५७ वर्षे, धंदा नोकरी, रा. वरीलप्रमाणे. iii) शैलाबाई कृष्णा रोकडे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा, वरीलप्रमाणे. IV) रोहित कृष्णा रोकडे, वय २७ वर्षे, धंदा नोकरी, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे, मयत शामराव सुपडु रोकडे यांचा दिनांक २१/०३/१९८० रोजी सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत शामराव सुपड्डु रोकड यांचे वारस असुन त्यांना सी.टी. सर्व्हे ७०४ क्षेत्र ७२ चौ. मीटर त्यांच्या नावे फेर करण्यासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी दिनांक १८/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता.२४/०१/२०२५

आदेशावरुन

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 543/2024

अर्जदार : १. मंदाबाई भ्र.रमेश पवार, २. गणेश पिता रमेश पवार, ३. अर्चना भ्र.गोरख सपकाळ, रा. महालगाव, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ४. उज्वला भ्र. सुनील पगार, रा.गोळवाडी, ता.जि. औरंगाबाद ४ ५. रामेश्वर पिता रमेश पवार, अर्जदार नं. १. २ आणि ५ रा.वॉर्ड नं. १, रेल्वे पुल जवळ, सावंगी-लासुर स्टेशन, ता.गंगापुर जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ यांचे पती आणि अर्जदार नं. २ ते ५ यांचे पिता नामे रमेश अंबादास पवार यांचा दि. ०१/०६/२०११ रोजी मौजे सावंगी लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु झाला आहे. मयत रमेश अंबादास पवार यांना अर्जदार नं. १ ते ५ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत रमेश अंबादास पवार यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, गंगापुर

# एमजीएममध्ये राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विशेष व्याख्यान संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ : भारताचे प्रसिद्ध गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय गणित दिवस साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान शाखेच्या गणित विभागाकडून विशेष व्याख्यानाचे दूरदृश्यप्रणालीमार्फत आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानमालेत रसायन तंत्रज्ञान संस्था (आयसीटी) मुंबईच्या गणित विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. गुणवंत बिराजदार यांनी 'मॅथेमॅटीकल मॉडेलिंग बाय डिफरेंशियल ईक्केशन्स' या विषयावर उपस्थितांशी दूरदृश्य प्रणालीमार्फत संवाद साधला.

या व्याख्यानाच्या माध्यमातून संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना भिन्न समीकरणांच्या क्षेत्रात गणितीय मॉडेलिंगबद्दल नाविन्यपूर्ण कल्पनांबद्दल माहिती मिळाली. या दूरदृश्य प्रणालीमार्फत झालेल्या व्याख्यानामध्ये संपूर्ण भारतातून विद्यार्थी व संशोधक सहभागी झाले होते.

यावेळी, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, संचालक डॉ.अण्णासाहेब खेमनर, विभागप्रमुख प्रा.डॉ.शिल्पी देवांगन, प्रा.उत्तरा देशमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/ जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-७३५

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : सीमा सुनील बावस्कर रा अंधानेर ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय अंधानेर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा कुणाल सुनील बावस्करच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा कुणाल सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०५-०४-२००९ रोजी अंधानेर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा कुणाल सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०५-०४-२००९ रोजी बंधानेर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा कुणाल सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०५-०४-२००९ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०५-०४-२००९ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/ जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-७३६

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : सीमा सुनील बावस्कर रा अंधानेर ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय अंधानेर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी समीक्षा सुनील बावस्करच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी समीक्षा सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०१-०१-२००८ रोजी अंधानेर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी समीक्षा सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०१-०१-२००८ रोजी बंधानेर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी समीक्षा सुनील बावस्करचा जन्म दिनांक ०१-०१-२००८ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१-०१-२००८ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं..५८७/२०२४

अर्जदार - १. चंद्रकला येडु सुकासे, रा. पळसगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. रंजना अनिल पोटे वय - ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. शिरसगावं, ता. नेवासा, जि. अहमदनगर ३. लता अरूण टाके वय ३२ वर्ष, धंदा घरकाम, रा. खडक वाघलगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ४. पुजा ज्ञानेश्वर काळे वय २५ वर्ष, धंदा- घरकाम, रा. सिरसगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ हि मयत येडु रामजी सुकासे यांची पत्नी असुन व अर्जदार कं. २ ते ४ हया मुली आहेत. येड्डु रामजी सुकासे हे दिनांक २६/०८/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत येडु रामजी सुकासे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसादार नाहीत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत येडु रामजी सुकासे यांचे कायदेशीर वारसदार आहेत या बाबत वारसाच्या प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्यामुळे त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत येडु रामजी सुकासे यांचे वारसदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनंतर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख ०४/०२/२०२५.

आज दिनांक १९/१२/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाक्ष्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सरपंच स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी बीडमध्ये शनिवारी निघणार सर्वपक्षीय मोर्चा



(छाया-कृष्णा शिंदे,बीड)




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार शनिवार दि.२८ डिसेंबर रोजी सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात येणार असल्याचे ठरले आहे.

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक शनिवार दि.२८ रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून मोर्चाला सुरूवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोर्चा विसर्जित होणार आहे. आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थिती लावली होती.

# सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनातील प्रत्येक आरोपीला शिक्षा होईल

देशमुख कुटुंबीयांच्या भविष्याची शासन हमी देत आहे, बीडमधील गुन्हेगारी कायमस्वरूपी संपविणार...!
उद्योगमंत्री उदय सामंत यांची देशमुख कुटुंबीयांशी भेट
सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ तसेच राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणाने हत्या करण्यात आली, यातील एकही आरोपीला आम्ही सोडणार नाही अशी शासनाची भूमिका आहे हे सांगण्यासाठी व देशमुख कुटुंबीयांना शासन त्यांच्यासोबत खंबीरपणे आहे ही हमी देण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांचा संदेश आपणास देत आहोत. शासन सर्वप्रथम तुमच्या सोबत आहे असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज देशमुख कुटुंबीयांचा सांत्वनाप्रसंगी सांगितले.



उद्योग मंत्री यांच्यासोबतच राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांनी आज या परिवाराच्या सांत्वनासाठी भेट दिली. यावेळी त्यांनी गावकऱ्यांसोबत देखील चर्चा करून त्यांची म्हणणे ऐकून घेतले.

या प्रकरणात असणारे मुख्य आरोपी तसेच त्यामागील सूत्रधार यांना आठवड्याभरात अटक करून कारवाई करण्यात येईल असे याप्रसंगी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी गावकऱ्यांशी बोलताना सांगितले. श्री. शिरसाट यांनी आज येथे भेट देण्यापूर्वी बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन याप्रकरणी होत असलेल्या तपासाची माहिती घेतली.

यावेळी देशमुख कुटुंबीयांनी चर्चा केल्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या प्रकरणी एसआयटी गठीत करण्यात आलेली असून न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येत आहे, त्यामुळे या प्रकरणात लवकरात लवकर दोषीना शिक्षा व्हावी तसेच देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आदेश दिले आहेत असेही ते म्हणाले.

पंधरा वर्षे सार्वजनिक जीवनात राहून स्वतःचे साधे घरही न बांधणारे दिवंगत सरपंच देशमुख यांची गावाच्या विकासाची तळमळ त्यांच्या कामातून लक्षात येते व या पुढील काळातही त्याच प्रकारचा विकास या गावात होईल याची खबरदारी शासन घेईल असे सामंत यांनी ग्रामस्थांशी चर्चा करताना सांगितले.

याबाबत सातत्याने मागणी करणाऱ्या राज्यातील सरपंच संघटनेच्या निवेदनाची दखल शासनाने घेतली आहे असेही उदय सामंत यावेळी म्हणाले. देशमुख यांच्या कुटुंबीयांना शिवसेनेतर्फे मदत देण्यात येईल असे सांगून सामंत यांनी देशमुख यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील आम्ही घेत आहोत असे यावेळी सांगितले.जी घटना घडली ही अतिशय निंदनीय आहे याबाबत मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण तपासाचे निर्देश दिले आहेत त्यामुळे येणाऱ्या काळात देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यास शासन कटीबद्ध आहे असे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यावेळी भेटीदरम्यान सांगितले.

# मस्साजोग प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून ॲड.कोल्हे यांची नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणी अवघ्या राज्यात खळबळ उडाली आहे. याप्रकरणात विशेष वकील म्हणून ॲड.बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोल्हे हे बाजू मांडणार आहेत. संतोष देशमुख यांची गेल्या काही दिवसांपूर्वी निघृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली तर काही आरोपी अद्यापही फरार आहेत. हे प्रकरण अवघ्या राज्यात चर्चेत आले आहे. संसदेसह विधीमंडळात या प्रकरणावर आवाज उठविण्यात आला. हत्या प्रकरणात विशेष वकिलाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

# नवीन पोलीस अधीक्षक यांचे बीड जिल्ह्यात स्वागत

परळी शहर आणि तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी कठोर पावले उचलावीत – राजेभाऊ फड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

बीड जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करून नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कांवत हे रुजू होत आहेत. बीड जिल्ह्यात बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेता हा निर्णय घेत असल्याची घोषणा मुख्यंत्र्यांनी विधिमंडळात केली. आता नवीन पोलीस अधिक्षकांकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. बीड जिल्ह्यातील आणि परळी शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांना पायबंद घालावा ज्यामुळे गुन्हेगारी कमी होईल अशी



अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत अनेक विचित्र घटना घडल्याने जिल्ह्याचे नाव देशभरात बदनाम झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा अजिबात धाक राहिलेला नाही. खून, दरोडे, चोऱ्यामाऱ्या, अवैध दारू विक्री, अवैध गुटखा, वाळू माफिया, तसेच अनेक प्रकारचे अवैध धंदे चालत आहेत. यावर नावे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी विशेष लक्ष घालून क्लीनअप मोहीम हाती घ्यावी तसेच परळी आणि तालुका परिसरात चालू असलेल्या अनेक अवैध धंद्यांना पायबंद करावा. यामुळे येथील कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत होईल. तर बदनाम होत असलेले जिल्ह्याचे नाव आणि प्रतिमा सुधारणेसाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलावीत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

# विना परवाना जनावरांच्या वाहतूक केल्याबद्दल दोघावर गुन्हा दाखल :४ लाखाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

परळी गंगाखेड रस्त्यावर उक्कडगाव कॅनॉलजवळ एका बोलरो पिकअप मध्ये जनावरांची विना परवाना वाहतूक होत होती, पोलीसांना माहिती मिळताच या गाडीची तपासणी केली असता जनावरे आढळून आली, या प्रकरणी दोघावर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



परळी गंगाखेड रस्त्यावर उक्कडगाव कॅनॉलजवळ ताजिदिन हनिफ पठाण (रा. पानगाव, रेणापूर), मोहिन शेख पि काळु शेख (परळी) हे दोघे महिंद्रा बोलेरो पिकअप क्रमांक एम एच २४ बी ६६७५ मध्ये जनावरे खरेदी विक्रीचा परवाना न बाळगता जनावरांना वेदना होतील अशा रितीने गाडीत एका जागेवरुन दुस–या जागेवर गैरवाजवी पणे आखुड जागेत दोरीने बांधुन चारापाणी न करता जनावरांना क्रूर वागणुक देवुन छळ करुन विनापरवाना घेवुन जात असताना आढळून आला. या प्रकरणात एकूण ४,०१,०००/- याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण जाधव यांच्या फिर्यादिवरुन येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्री तोटेवाड करत आहेत.

# पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी, एसपींनी गुन्हेगारी रोखावी-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

बीड जिल्ह्यात गुंडगिरी फोफावत आहे. या गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत.पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या काचा असलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत आणि अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे एस. पी. नवनीत कावत यांनी याबाबत त्वरित आदेश द्यावेत. गुन्हेगारीवर रोख आणावी, असे आवाहन जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड.अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

जिल्ह्यातील गुन्हेगार पोलिसांना माहीत आहेत. याच सलोख्याने वाळू माफिया, गुटखा माफिया, खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. हे सर्व गुन्हेगार काळया काचाच्या गाडीतून फिरतात. डिजिटल नंबर प्लेट गाड्यांना लावतात. त्यामुळे पोलिसांनी बेकायदेशीर रीतीने चालणाऱ्या या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. वाहनांवर कारवाई करत असताना ड्रायव्हरचे लायसन देखील निलंबित करावे. गुन्हेगारांमार्फत दहशतीचे वातावरण पसरवले जात असून याला अनेक जण कारणीभूत आहेत. यातून बीड जिल्ह्यात व्यवसाय निमित्त कोणीही येण्यास तयार नाही. जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असून हे कुठेतरी रोखणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या पद्धतीने पाऊले उचलून जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांने पुढे येणे आवश्यक आहे. मस्साजोग येथे आज भेट दिल्यानंतर जी परिस्थिती तिथे दिसली, त्यावरून विदारक चित्र निर्माण होत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर वाळू माफिया, गुटखा माफिया खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. प्रशासनातील अनेक लोक हप्तेखोरी मुळे या लोकांबरोबर जोडले गेले आहेत. समाजासाठी ही बाब विघातक आहे. हे सर्व रोखण्यासाठी आज समाजातील दक्ष नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. बीड जिल्हा बिहार झाल्याचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. येथील गुंडगिरी देखील त्याचप्रमाणे आहे. नवीन एसपी काय करतात, याकडे देखील जनतेचे लक्ष लागले आहे, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# प्रमोद वझे यांची संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांत मंत्रीपदी निवड;तर प्रचार प्रसिद्धी प्रमुखपदी महेश वाघमारे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२३ डिसेंबर**

संस्कार भारती देवगिरी प्रांतच्या कार्यकारिणीवर बीड जिल्ह्यातून चार जणांची निवड झाली असून विद्यमान जिल्हाध्यक्ष प्रमोद वझे यांची मंत्री म्हणून निवड करण्यात आली आहे.त्यांच्या सोबत सरंक्षक म्हणून जेष्ठ कलावंत भरतअण्णा लोळगे,साहित्य विधा संयोजक-डॉ.विद्यासागर पाटांगणकर,कला धरोहर संयोजक-प्रा.दत्तप्रसाद गोसावी(अंबाजोगाई) लोककला सह संयोजक डॉ.वैशाली गोस्वामी (अंबाजोगाई) व प्रचार आणि प्रसिद्धी प्रमुख पदावर जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांची निवड छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आली.

संपूर्ण कार्यकारिणी

संरक्षक – भरतअण्णा लोळगे,सल्लागार- सुधीर कुलकर्णी, अध्यक्ष-स्नेहलताई पाठक, कार्याध्यक्ष – भगवानराव देशमुख, उपाध्यक्ष-विश्वनाथ दाशरथे,डॉ.अरविंदराव देशमुख, सुनीता घाटे,देवेंद्र कुलकर्णी, महामंत्री – डॉ.जगदीश देशमुख,सह महामंत्री – सतीश महामुनी आणि अभय शृंगारपुरे, मंत्री प्रमोद वझे,रवींद्र देशपांडे, शरद दांडगे,धनंजय देशपांडे,कोष प्रमुख-मोहन रावतोळे, सह कोषप्रमुख – संजय घायाळ,मातृशक्ती प्रमुख – गीता रावतोळे,मंचीय कला संयोजक –डॉ जयंत शेवतेकर,संगीत – पं. संजय जोशी, सहसंगीत – दिलीप चौधरी,नृत्य- रमा करजगावकर आणि





विक्रांत वायकोस, नाट्य- निलेश देशपांडे,सहनाट्य – विजय करभाजन आणि गिरीधर पांडे,दृश्य कला संयोजक – शेषनाथ वाघ,सह संयोजक – संतोष पाठक,भू-अलंकरण – अमित देशपांडे,छायाचित्र-फोटोग्राफी – पद्माकर मोकासे,चित्रकला-केदार नाईक, सह चित्रकला- अनिल पाटील,लोककला संयोजक – डॉ.मार्तंड कुलकर्णी,सह संयोजक – डॉ.वैशाली गोस्वामी,सारंग रोकडे,शेखर भाकरे,साहित्य विधा संयोजक – डॉ.विद्यासागर पाटांगणकर, सह संयोजक – नारायण पांडव आणि धनंजय गुडसुरकर,कला धरोहर संयोजक – प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी,सह संयोजक- अजय कासोदेकर,प्रचार व प्रसिद्धी प्रमुख- महेश वाघमारे, कार्यकारिणी सदस्य – जयेंद्र कुलकर्णी.

या सर्व पदाधिकाऱ्यांचे यावेळी पुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.विशेष सर्वसाधारण सभेचा प्रारंभ संस्कार भारती ध्येयगीत गायन, दीपप्रज्वलन,नटराज पूजन आणि पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांना अभिवादन करून करण्यात आला. प्रारंभी पश्चिम क्षेत्र प्रमुख चंद्रकांत घरोटे यांनी संस्कार भारतीच्या कार्याची नवी रचना विस्ताराने सांगितली तर अ.भा. मंत्री आशुतोष आडोनी यांनी मार्गदर्शन केले. आपले दायित्व हे मनःपूर्वक निभावले पाहिजे असे सांगून ते म्हणाले की विविध कार्यक्रम आयोजित करतांना यातून कलेच्या माध्यमातून देशहित आणि देशभक्तीचा विचार मांडला गेला पाहिजे.मानवी मनातील वाईट विचार दूर करण्यासाठी कला हे सर्वोत्तम साधन असून कलेच्या माध्यमातूनच समाजातील वाईट प्रवृत्ती दूर करीत सद्विचाराची पेरणी करता येते.आपल्या विस्तारित भाषणात त्यांनी विविध उदाहरणे देऊन आपले विचार स्पष्ट करीत संस्कार भारतीच्या पदाधिकारी आणि कला साधकांनी आपली कला राष्ट्राप्रति समर्पित करावी असे आवाहन केले.देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा स्नेहल पाठक यांनी अध्यक्षीय समारोप करून नूतन पदाधिकारी बरोबर घेऊन अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.या सभेचे आभार प्रदर्शन आणि सूत्रसंचालन नारायण पांडव यांनी केले. सामूहिक पसायदान गायनानाने या विशेष सर्वसाधारण सभेचा समारोप करण्यात आला. संस्कार भारतीचे बीडजिल्हा संघटन मंत्री लक्ष्मीकांत सौंदत्तीकर,जिल्हा समन्वयक गणेश तालखेडकर, डॉ. राहुल पांडव , महेश देशमुख, शहर सचिव अनिल कुलकर्णी, श्रीपाद देशमुख आणि बीड,लातूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, आणि जळगाव जिल्ह्यातील सदस्य हे या विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित होते.

## अग्रलेख...

# पुन्हा आलेल्या फडणवीसांची कामगिरी दमदार!

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात संपन्न झाले. आठवडाभर चाललेले हे अधिवेशन खऱ्या अर्थाने गाजवले ते पुन्हा आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी. राज्यपालांच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चेला उत्तर असो, परभणी आणि बीडमध्ये घडलेल्या घटनांवर झालेल्या चर्चेला उत्तर असो किंवा मग पुरवणी मागण्यांसंदर्भात केलेले भाषण असो, मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी अतिशय दमदार भूमिका मांडली. जे बोलायचे ते रोखठोक. जे सांगायचे ते अतिशय स्पष्ट. कुठेही त्यांनी संदिग्धता ठेवली नाही. अत्यंत परिश्रमी, आत्मविश्वासपूर्ण, संयमी, समर्पित नेता त्यांच्या रूपाने या अधिवेशनात पाहायला मिळाला. मंत्रिमंडळाच्या खातेवाटपाशिवाय अधिवेशन संपूर्ण गतीने आणि गांभीर्याने पार पाडण्यात त्यांचे सारे कौशल्य पणाला लागल्याचे राज्याने पाहिले. अत्यल्प विरोधकांनी त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण, फडणवीस पुरून उरल्याचेच पाहायला मिळाले. तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यापासून देवेंद्र फडणवीस यांच्या कामाची शैलीही बदललेली जाणवली. सुरुवातीपासूनच प्रशासनावर मजबूत पकड मिळवण्यात त्यांना यश आल्याचे आनंददायी चित्र दिसते आहे. उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांची उत्तम साथ त्यांना लाभली असल्याचे सुखावह चित्रही अधिवेशनात दिसले. हिवाळी अधिवेशनात ज्या ज्या मुद्यांवर चर्चा झाली, त्या सगळ्या बाबतीत देवेंद्र फडणवीस यांनी अभ्यासपूर्ण निवेदन केले. राज्याचा मुख्यमंत्री कसा असावा याचा आदर्श फडणवीस यांनी प्रत्यक्ष कृतीतून घालून दाखविला, ही आनंदाची बाब म्हटली पाहिजे. गेली पाच वर्षे असह्य टीका सहन केल्यानंतर फडणवीस सन्मानपूर्वक राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या शरीरावरून, त्यांच्या कुटुंबावरून, त्यांच्या जातीवरून त्यांना मोठ्या प्रमाणात लक्ष्य करण्यात आले, हे राज्याने पाहिले आहे. पण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्कारांनी घडलेल्या फडणवीसांनी कुठेही संयम सोडला नाही. टीकेला उत्तर देताना त्यांच्यातल्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचा परिचय राज्याला घडला. ज्या उद्धव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर अतिशय व्यक्तिगत पातळीवर उतरून टीका केली, त्याच उद्धव ठाकरेंकडून हिवाळी अधिवेशन काळात विधानभवनात शुभेच्छा स्वीकारण्याचा मोठेपणाही फडणवीस यांनी दाखवला. एक अस्सल नागपूरकर कसा असतो आणि शेंडी-जानव्याचे हिंदुत्व कसे सुसंस्कृत, सर्वसमावेशक आणि उदार आहे, हेच फडणवीस यांच्या या कृतीतून दिसून आले. अधिवेशनापूर्वी त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळाची जी रचना केली, त्यात सामाजिक समतोल साधण्याचा उत्तम प्रयत्न त्यांनी केला. विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षप्रणीत महायुतीला मतदारांनी प्रचंड बहुमत दिल्यानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या पायाखालची वाळूच सरकली होती. लोकसभेच्या निवडणुकीत भरघोस यश मिळवणारी महाविकास आघाडी आणि आघाडीतल्या तीन पक्षांचे नेते हवेत होते. लोकसभेप्रमाणेच विधानसभेतही प्रचंड यश मिळेल आणि सरकार आपलेच येईल या भ्रमात असलेल्या महाविकास आघाडीला बेसावध ठेवत महायुतीने पराभवातून धडा घेत स्वतःच्या चुका सुधारल्या आणि जनमत आपल्याकडे वळविण्यात यश मिळवले. विजय आपलाच होणार या भ्रमात राहिलेली महाविकास आघाडी पराभवाच्या धक्क्यातून बाहेर पडल्याचे अधिवेशनात दिसले नाही. ईव्हीएमच्या नावाने गळे काढत मतदारांचा अपमान करण्यातच त्यांनी धन्यता मानल्याचे अधिवेशनभर पाहायला मिळाले. यासंदर्भातील विरोधी पक्षांच्या खोट्या आरोपांनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चोख उत्तर दिले. समयसूचकता ठेवून, हजरजबाबी राहून विरोधकांचे हल्ले कसे परवतले जातात, याचा प्रत्यय फडणवीस यांनी आणून दिला. त्यांच्या नेतृत्वातील सरकार सत्तेवर येताच नागपुरात हिवाळी अधिवेशन झाले. पण, अभ्यासू, परिश्रमी फडणवीस कुठेही डगमगल्याचे दिसले नाही. या अधिवेशनात प्रश्नोत्तराचे तास झाले नसले, लक्षवेधी नव्हत्या तरीसुद्धा भरपूर कामकाज झाले, व्यवस्थित झाले, विधान परिषदेच्या सभापतींची निवड अविरोध झाली. हे महायुतीच्या सरकारचे मोठे यश मानले पाहिजे. नव्या सरकारचे पहिले अधिवेशन तर सुरळीत पार पडले, हे महत्त्वाचे आहे. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची संधी मिळालेले देवेंद्र फडणवीस केंद्रातील मोदी सरकारच्या मदतीने महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रांत प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर करतील, यात शंका नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणजे विद्वत्ता आणि लोकप्रियतेचा मिलाफ साधणारे एक दुर्मिळ राजकीय व्यक्तिमत्त्व आहे. नागपूर विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतल्यानंतर त्यांनी व्यवसाय व्यवस्थापनात स्नातकोत्तर पदवी आणि डी.एस.ई. बर्लिन येथून प्रकल्प व्यवस्थापनाच्या पद्धती आणि तंत्र या विषयात पदविका मिळवली. नव्वदीच्या दशकात राजकारणात प्रवेश केल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी मोठा जनाधार प्राप्त केला. देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या जनतेचे प्रतिनिधित्व करत असतानाच पक्षासाठी विविध स्तरावर नेतृत्व केले. नागपूर महानगरपलिकेचे महापौरपद भूषविले असून, भारतातील आजवरचे सर्वात तरुण महापौर अशी त्यांची ख्याती आहे. महापौरपदी पुन्हा निवडून येऊन मेयर इन कौन्सिलचा मान मिळविणारे ते पहिलेच. देवेंद्र फडणवीस हे अनुभवी लोकप्रतिनिधी असून राजकीय बुद्धिचातुर्य व कौशल्यातही त्यांना विविध व्यासपीठांनी गौरवलेले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची दखल राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही घेण्यात आली, असून राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. तसेच जागतिक संसदीय फोरमच्या सचिवपदी ते कार्यरत होते. असा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा धनी मुख्यमंत्री म्हणून आपल्याला लाभला, हे आपले भाग्यच!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची गेल्या १० वर्षांची कारकीर्द ही त्यांच्या आजवरच्या तडफदार कामाला साजेशी अशीच आहे. ५०० कोटी रुपयांच्या लोकसहभागातून उभारलेली जलयुक्त शिवार योजना, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या कामाला गती, नागपूर आणि पुणे मेट्रोची पायभरणी, इंदू मिलच्या जागेवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या लंडनमधील घराची खरेदी करून तेथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाची उभारणी, काँग्रेस-राकाँच्या काळात १६ व्या क्रमांकावर असलेले राज्य पहिल्या क्रमांकावर आणणे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहर व ग्रामीण वर्गवारीत राज्याला देशात अव्वल आणणे, हागणदारीमुक्त शहरांच्या यादीत महाराष्ट्राला अव्वलस्थानी आणणे आणि राज्यात सर्वत्र उड्डाणपूल आणि रस्तेबांधणीची सुरू असलेली कामे, या काही महत्त्वाच्या कामांची नोंद त्यांच्या नावावर करावीच लागेल. जलयुक्त शिवार योजनेंतर्गत अवघ्या दोन वर्षांत ११,४८३ गावांमध्ये २,४१,०९७ कामे त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कार्यकाळात करण्यात आली. त्यामुळे शाश्वत सिंचनाचे स्रोत खुले होऊन अनेक गावांत प्रथमच पाणीसाठे निर्माण झाले. यामुळे अवघ्या ३४२२ कोटी रुपयांत ११,६४,३४७ हेक्टर इतकी सिंचनक्षमता (४२ टीएमसी) निर्माण झाली, हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य सांगता येईल. विदर्भाच्या सिंचन अनुशेषाचा अभ्यास करून विधिमंडळात अन्यायाविरुद्ध संघर्ष करताना सगळ्यांनीच फडणवीस यांना पाहिले आहे. २०१४ ते १९ या कालावधीत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत सुमारे ५२ हजार शेततळ्यांसाठी लाभार्थींची निवड करण्यात आली होती, हे कसे विसरता येईल? अर्थकारण, शिक्षण, क्रीडा, सामाजिक न्याय, रोजगार, पर्यटन, वस्त्रोद्योग, वीजनिर्मिती, आरोग्य, महसूल, पर्यावरण, कृषी, आदिवासी विकास, संस्कृती, माहिती-तंत्रज्ञान, महिला व बालविकास, कायदा, गुन्हेगारी नियंत्रण, अल्पसंख्यक विकास आदी क्षेत्रांतील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील आधीच्या सरकारची कामगिरीही लक्षवेधीच राहिली आहे. दूरदृष्टी, योग्य आणि तत्काळ निर्णय, अचूक दिशा यामुळे सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्राने प्रगती केलेली दिसून येते. फडणवीसांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीची २५-२७ वर्षे पूर्ण केली आहेत. मुख्यमंत्रिपदाच्या त्यांच्या या कार्यकाळासाठी आणि प्रदीर्घ राजकीय वाटचालीसासाठी हार्दिक शुभेच्छा!

## दिल्ली दिनांक


रवींद्र दाणी

# २०३४ : एक देश एक निवडणूक!

२०३४ पासून एक देश एक निवडूक संकल्पना देशात लागू केली जाईल. देशात सतत सुरू असणारे निवडणुकीचे चक्र मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारने योग्य वेळी 'एक देश एक निवडणुकी'चे विधेयक सादर केले. लोकसभेत सादर करण्यात आलेले १२९ वे घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या संयुक्त संसदीय समितीकडे पाठविले जाईल असे समजते. समितीत त्यावर विचार करून नंतर विधेयकाच्या अंतिम मसुद्याला स्वीकृती दिली जाईल. त्यानुसार केंद्रीय मंत्रिमंडळ पुन्हा या विधेयकाला स्वीकृती देईल व ते पुन्हा लोकसभेत सादर करून पारित केले जाईल असे संकेत आहेत. यासाठी काही महिन्यांचा अवधी लागण्याची शक्यता आहे.

**२०३४ पासून** : विधेयकात करण्यात आलेल्या तरतुदीनुदार २०३४ पासून हे विधेयक लागू केले जाईल. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी राष्ट्रपती याबाबतची अधिसूचना काढण्याची तारीख घोषित करतील व नंतर याच्या अंमलबजावणीस सुरुवात होईल. विधेयकातील या तरतुदीचा स्पष्ट अर्थ म्हणजे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत हे विधेयक लागू होणार नाही. ते लवकरात लवकर म्हणजे २०३४ मध्ये लागू होऊ शकेल. या विधेयकातील एक महत्त्वाची तरतूद म्हणजे एखाद्या विधानसभा वा लोकसभेचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वीच ती विधानसभा वा लोकसभा बरखास्त करावी लागली तर, तेथे मुदतपूर्व निवडणूक तर होईल पण केवळ संबंधित विधानसभेचा उर्वरित काळ पूर्ण करण्यासाठी. म्हणजे २०३४ मध्ये विधेयक लागू झाल्यानंतर २०३६ मध्ये एखादी विधानसभा बरखास्त करावी लागली तर त्या राज्यात विधानसभेची पुन्हा निवडणूक होईल. पण पाच वर्षांसाठी नाही तर तीन वर्षांसाठी. म्हणजे एक देश एक निवडणूक नियम लागू झाल्यानंतरही काही निवडणुका होत राहणार आहेत. हीच बाब लोकसभेलाही लागू होईल. लोकसभा निवडणूक झाल्यावर मध्येच सरकार कोसळले तर लोकसभेची निवडणूक तर घेतली जाईल पण ती पाच वर्षांसाठी नसेल तर लोकसभेचा उर्वरित कार्यकाळ पूर्ण करण्यासाठी असेल.

**४१ वर्षांपासून** : १९८३ पासून 'एक देश एक निवडणूक'ची चर्चा देशात सुरू आहे. निवडणूक आयोग, विदी आयोग यासारख्या व्यासपीठांवर यावर अनेकदा चर्चा झाली आहे. पण, शेवटी याबाबतचा निर्णय तर केंद्र सरकारला घ्यावा लागतो. तो निर्णय सरकारने घेतला. विधेयक तयार झाले. मंत्रिमंडळाने त्याला स्वीकृती दिली. ते संसदेत मांडण्यात आले. म्हणजे 'एक देश एक निवडणूक'च्या दिशेने एक मोठे पाऊल सरकारने टाकले आहे. याने काळ्या पैशाचा वापर कमी होईल, जनहिताच्या खऱ्या खुऱ्या मुद्यांकडे लक्ष देता येईल



व सामान्य जनतेला दिलासा मिळेल असे मानले जाते.

**पारित होण्याची प्रक्रिया** : संसदेत सादर करण्यात आलेले घटनादुरुस्ती विधेयक पारित करण्यात मात्र सरकारला अडचणी येणार आहेत. मोदी सरकारजवळ लोकसभेत स्पष्ट बहुमत आहे. पण तेही काही मित्रपक्षांच्या पाठिंब्यामुळे. भाजपाचे २४० सदस्य आहेत. शिवसेना, तेलगू देशम व जनता दल युनायटेड यांचा पाठिंबा विचारात घेतला तरी सरकारचा आकडा तीनशेच्या पुढे जात नाही आणि विधेयक पारित करण्यासाठी लोकसभेत ३६१ सदस्यांच्या पाठिंबा लागणार आहे. एवढे संख्याबळ सरकार कसे आणि कुठून जमविणार हा एक लाखमोलाचा प्रश्न आहे.

लोकसभेत हे विधेयक सादर केले जात असताना भाजपाचे काही सदस्य सभागृहात अनुपस्थित राहिले. आता त्यांना कारणे दाखवा नोटिसा पाठविल्या जाणार आहेत. राज्यसभेतही सरकारला या समस्येचा सामना करावा लागणार आहे.

**सर्वांत मोठा अडथळा** : संसदेच्या दोन्ही सभागृहांनी विधेयक पारित करून त्याला ५० टक्के राज्य विधानसभांनी मान्यता दिली तरी या विधेयकाच्या अंमलबजावणीतील सर्वांत मोठा अडथळा सर्वोच्च न्यायालयाकडून होणारी वैधानिक छाननी हा राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयात या संदर्भात किती मोठ्या संख्येत याचिका दाखल केल्या जातील याची कल्पनाच न केलेली बरी. राजकीय पक्ष, वेगवेगळ्या संघटना, वरिष्ठ वकील यांच्याकडून या कायद्याला आव्हान दिले जाईल हे स्पष्ट आहे.

**मोठे घटनापीठ** : सर्वोच्च न्यायालय यासाठी एक मोठे घटनापीठ गठित करील. सर्वोच्च न्यायालयात प्रसिद्ध केशवानंद भारती निवाडा १३ न्यायधीशांच्या घटनापीठाने दिला होता. एक देश एक निवडणूक कायद्याची छाननी करण्यासाठी किमान एवढे घटनापीठ गठित करावे लागणार आहे. कारण सर्वोच्च न्यायालयाला वेगळा निवाडा द्यावा वाटल्यास लहान घटनापीठ मोठ्या घटनापीठाचा निवाडा बदलू शकणार नाही. आवश्यकता वाटल्यास केशवानंद भारती खटल्यापेक्षा मोठे घटनापीठ गठित करावे लागेल. याच्या सुनावणीसाठी किती महिने - वर्ष लागतील याचा अंदाज कुणालाही बांधता येणार नाही. एक देश एक निवडणूक प्रकरणात काही मोठे मूलभूत विषय गुंतले असल्याने सर्वोच्च न्यायालयात या खटल्यास भरपूर वेळ लागेल असे मानले जात आहे.

**कोविंद समिती** : एक देश एक निवडणूक यावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारने २०२३ मध्ये माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. समितीकडे जवळपास १९ हजार लोकांची निवेदने आली. त्यावर विचार करून समितीने आपला १८ हजार पृष्ठांचा अहवाल यापूर्वीच केंद्र सरकारला सादर केला असून त्याआधारे केंद्र सरकारने हे विधेयक तयार केले आहे.

**अंमलबजावणीसाठी** : २०३४ मध्ये एक देश एक निवडणूक लागू करण्यासाठी काही राज्य विधानसभांचा कार्यकाळ लवकर संपवावा लागेल हे अपेक्षित धरण्यात आले आहे. यासाठी उत्तरप्रदेशचे उदाहरण देता येईल. विद्यमान राज्य विधानसभेची मुदत २०२७ ला संपत आहे. पुन्हा निवडणूक झाल्यावर अस्तित्वात येणाऱ्या विधानसभेचा कार्यकाळ २०३२ मध्ये संपेल. नवी विधानसभा निवडण्यासाठी ३२ मध्ये होणारी निवडणूक केवळ दोन वर्षांची विधानसभा निवडील असा सरकारने लोकसभेत सादर केलेल्या विधेयकाचा अर्थ सांगण्यात आला आहे. हाच निकष मानल्यास बिहार व दिल्ली विधानसभा चार वर्षांसाठी निवडली जाईल. अर्थात् या सर्व बाबींना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाईल हे स्पष्ट आहे. कारण, राज्यघटनेच्या मूळ चौकटीत लोकसभा व राज्य विधानसभांचा कार्यकाळ पाच वर्षांचा सांगण्यात आला आहे. त्यामुळे एक वा दोन वर्षांसाठी विधानसभा निवडण्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाणे अपरिहार्य ठरणार आहे. या बाबी सर्वोच्च न्यायालय व केंद्र सरकार कसे हाताळील हे तर ती परिस्थिती उद्भवल्यावरच स्पष्ट होईल.

**महिला विधेयक** : एक देश एक निवडणूक विधेयक २०३४ पासून केले जाण्याचे स्पष्ट झाले असताना, महिला आरक्षण विधेयकही २०३४ पासून लागू केले जाईल असे समजते. संसदेने महिला आरक्षण विधेयक यापूर्वीच मंजूर केले आहे. आता ते लागू केले जाणे बाकी आहे. त्यासाठी लोकसभा-विधानसभा मतदारसंघाची निश्चिती, नव्याने आखणी याबाबी केल्या जाणाऱ्या आहेत. महिला आरक्षण विधेयक लागू करण्यातही काही समस्या येणार आहेत. त्यावर विचार करून ते लागू करणे व त्याचवेळी एक देश एक निवडणूक लागू करणे या दोन्ही बाबी एकाच वेळी देशात लागू होतील असा एक अंदाज आहे. तसे झाल्यास देशात संसदीय लोकशाहीचे नवे पर्व सुरू होईल.


## वेध

अनिरुद्ध पांडे

# उन्मादाचा पहिला बळी

स्वामी श्रद्धानंद यांचा हा ९८ वा स्मृतिदिन. २३ डिसेंबर १९२६ ला स्वातंत्र्यसेनानी, समाजसेवी, पत्रकार व अध्यापक अशा विविध भूमिका प्रभावीपणे पार पाडणाऱ्या स्वामी श्रद्धानंदांची अब्दुल रशीद नावाच्या एका उन्मादी मुसलमानाने गोळी मारून हत्या केली होती. कथित 'सर्वधर्मसमभावी' भारतातील 'उन्मादी मानसिकतेचा' कदाचित हा पहिला बळी असावा..! २२ फेब्रुवारी १८५६ रोजी, म्हणजे गांधीजींच्या तेरा वर्षे आधीच जन्मले होते श्रद्धानंद. नानकचंद विज यांच्या म्हणजे खत्री परिवारात पंजाबमधील जालंधर जिल्ह्यात तलवान या गावी त्यांचा जन्म झाला होता. या खत्रींनी त्यांची बृहस्पती व मुन्शीराम अशी दोन नावे ठेवली. पण सोपे 'मुन्शीराम' हेच रूढ झाले. पोलिस अधिकारी वडील नानकचंद यांना बदल्यांमुळे गावे बदलावी लागत. त्यामुळे मुन्शीरामांचे सुरुवातीचे शिक्षण यथातथाच झाले. त्यांच्या तरुणपणी बरेली येथे आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद वैदिक धर्मप्रचारासाठी आले होते. त्यावेळी ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास नसणारे मुन्शीराम दयानंदांची तर्कशुद्ध मांडणी ऐकून प्रभावित झाले. या प्रवचनाने मुन्शीराम यांच्या मनात ईश्वरावर दृढविश्वास आणि वैदिक धर्माविषयी प्रचंड आस्था निर्माण झाली.

नियमित शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एक यशस्वी वकील म्हणून मुन्शीराम विज ओळखले जाऊ लागले. वकिलीसोबतच त्यांनी आर्य समाजाचे जिल्हा अध्यक्षपद स्वीकारून आपल्या सार्वजनिक आणि आध्यात्मिक जीवनाला सुरुवात केली. स्वामी दयानंद यांच्या महाप्रयाणानंतर ॲड. मुन्शीराम यांनी स्वतःला स्वदेश, स्वातंत्र्य, संस्कृती, समाज, भाषा, स्त्री उद्धार, दलितोत्थान, स्वदेशी प्रचार, वेदांचे उत्थान, पाखंड खंडन, अंधविश्वास निर्मूलन, धर्म उत्थान अशा विविध कामांमध्ये वाहून घेतले. १९०१ मध्ये त्यांनी इंग्रजांनी आणलेल्या शिक्षण पद्धतीच्या जागी वैदिक धर्म आणि भारतीयत्वाचे शिक्षण देणाऱ्या गुरुकुलाची स्थापना केली. हरिद्वारजवळ कांगडी येथील



हे गुरुकुल मानद विद्यापीठ म्हणून मान्यताप्राप्त आहे. त्या काळात मोहनदास गांधी भारतीय स्वातंत्र्यासाठी आफ्रिकेत संघर्ष करीत होते. मुन्शीराम विज यांनी त्यांच्या गुरुकुलच्या विद्यार्थ्यांकडून १५०० रुपये (आजच्या हिशेबाने कदाचित १५ लाख होतील) जमवून गांधीजींना पाठविले होते. गांधीजीसुद्धा भारतात परतले तेव्हा या गुरुकुलात जाऊन आले. तेथे त्यांनी मुन्शीराम व विद्यार्थी या देशभक्तांप्रति कृतज्ञताही व्यक्त केली. त्यावेळी मुन्शीराम यांनी गांधीजींचा उल्लेख 'महात्मा' असा पहिल्यांदा केल्याचेही सांगतात. दरम्यान, मुन्शीरामांनी पत्रकारितेतही पाऊल रोवले. त्यातून ते उर्दू आणि हिंदी भाषेतून धार्मिक व सामाजिक विषयांवर लिहीत असत. स्वामी दयानंद सरस्वतींच्या मार्गाने त्यांनी देवनागरी लिपीत लिहिलेल्या हिंदीला प्राधान्य दिले. त्यांचे 'सद्धर्म' हे नियतकालिक सुरुवातीला उर्दूतून निघत असे. पण पुढे त्यांनी ते हिंदीतून काढायला सुरवात केली. याच दरम्यान ॲड. मुन्शीराम विज यांनी १९१७ मध्ये संन्यास घेतला आणि स्वामी श्रद्धानंद अशी त्यांची नवी ओळख झाली. १९१९ मध्ये काँग्रेसच्या ३४ व्या अमृतसर अधिवेशनात स्वागत समिती अध्यक्ष म्हणून त्यांनी हिंदीत भाषण दिले आणि हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून ओळख मिळण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले. १९१९ मध्येच दिल्लीत जामा मशीद परिसरात झालेल्या एका विशाल जनसभेत त्यांनी सर्व भारतीयांनी धार्मिक मतभेद बाजूला ठेवून स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. काँग्रेससोबत काम करतानाच त्यांना प्रमुख काँग्रेसी नेत्यांची मुस्लिम तुष्टीकरणाची नीती खटकली. त्याचवेळी कट्टरपंथी मुसलमान आणि ख्रिश्चन हिंदूंच्या मत, मन आणि धर्मपरिवर्तनाच्या मागे लागले होते. याच सुमारास स्वामी श्रद्धानंदांनी हिंदू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली. ११ फेब्रुवारी १९२३ ला 'भारतीय शुद्धी सभे'ची स्थापना करून त्यांनी लाखो हिंदूंना स्वधर्मात परत आणले. स्वामी श्रद्धानंद या कट्टर हिंदुत्ववाद्याच्या अशा प्रत्युत्तराने मुस्लिम कट्टरपंथी त्यांना लक्ष्य करू लागले. तरीही ते मुस्लिम मौलवी आणि ख्रिश्चन पाद्री अशा धर्म अभ्यासकांसोबत 'धर्मचर्चा' नेहमीच करत. अशाच धर्मचर्चा, शास्त्रार्थाच्या निमित्ताने एक माथेफिरू कट्टरपंथी मुसलमान अब्दुल रशीद याने २३ डिसेंबर १९२६ रोजी स्वामी श्रद्धानंदांची गोळ्या घालून हत्या केली. दोनच दिवसांनी, २५ डिसेंबर १९२६ ला गोहातीमध्ये झालेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनात, महात्मा गांधींनी हत्यारा अब्दुलचा उल्लेख 'भाई अब्दुल रशीद' असा करून, 'मी याचा पुनरुच्चार करतो, मी त्याला स्वामी श्रद्धानंदांच्या हत्येचा दोषी मानत नाही. खरेतर यासाठी ज्यांनी मुस्लिमांविरुद्ध द्वेषभावना तयार केली तेच दोषी आहेत. ही वेळ दुःख प्रकट करण्याची किंवा अश्रू गाळण्याची नाही', असे जाहीरपणे सांगितले होते. काय बोलावे यावर...?

९८८१७१७८२९

## कानोसा

अमोल पुसदकर

# कायद्याचा गैरवापर थांबणे आवश्यक

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी. व्ही. नागरत्ना आणि न्या. पंकज मीठा यांच्या न्यायासनाने नुकताच एक निर्णय दिला. त्यात ते म्हणतात की, कायदे हे महिलांच्या हितासाठी बनविण्यात आलेले आहेत. कायदे हे पतीला धमकावणे, त्याच्यावर वर्चस्व गाजविणे किंवा त्याची पिळवणूक करण्यासाठी केलेले नाहीत. कायद्याचा उपयोग खंडणीचे साधन म्हणून होऊ नये असे न्यायालयाने म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी बंगलोर येथील इंजिनीयर अतुल सुभाष यांनी पत्नीद्वारा मानसिक आणि आर्थिक छळ केल्याच्या कारणावरून आत्महत्या केली होती. त्यांच्या विभक्त पत्नीने त्यांना मासिक दोन लाख रुपये आणि नंतर वार्षिक तीन कोटी रुपयांच्या पोटगीची मागणी केली होती. त्या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने केलेले वरील निरीक्षण महत्त्वाचे ठरते. न्यायालय यामध्ये म्हणते की, विभक्त पती आणि पत्नीला एकाच आर्थिक पातळीवर आणण्याचे पोटगी हे साधन नाही तर अवलंबून असलेल्या महिलेला योग्य पद्धतीने जीवन जगता यावे यासाठी केलेली ती तरतूद आहे.

रेमंड लिमिटेडचे मालक गौतम सिंघानिया आणि त्यांची पत्नी नवाज मोदी यांचा घटस्फोट हा भारतातील सर्वांत महाग घटस्फोट ठरलेला होता. यामध्ये त्यांच्या पत्नीने त्यांना काही हजार करोड रुपयांची मागणी केलेली होती. न्यायालयाने सुनावणी करताना महिलांनी कायद्याचा चुकीचा वापर केल्याची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. त्यामध्ये न्यायालय म्हणते की, अनेक खटल्यांमध्ये महिलांनी सासरच्या लोकांवर चुकीचे फौजदारी गुन्हे दाखल केलेले होते.

समाजामध्ये अशा प्रकारच्या घटना या भरपूर घडत असतात. एक वेळा विसंवाद निर्माण झाला की त्याच्याआधी गुण्यागोविंदाने राहणारे पती-पत्नी आणि त्यानंतर त्यांच्यामध्ये दोन्हीकडच्या नातेवाईकांचा झालेला प्रवेश यामुळे बरेचदा छोट्या मतभेदांना वादाचे स्वरूप येते आणि यामध्येच मग एकमेकांना पाहून घेण्याची भाषा केली जाते. कायद्याचा सर्रास गैरवापर होतो. काही वर्षांपूर्वी एक प्रकरण बघायला मिळाले ज्यामध्ये पती-पत्नी हे लग्नाच्या दोन महिन्यानंतरच विभक्त झाले. मुलगा सरकारी नोकरीमध्ये होता. त्याने घटस्फोट मिळण्यासाठी न्यायालयामध्ये अर्ज केला. त्याच्या विभक्त पत्नीकडून त्याला विरोध असल्यामुळे आठ वर्ष निघून गेले तरी त्याला काही घटस्फोट मिळाला नाही. परंतु एके दिवशी ती विभक्त पत्नी तिच्या मुलासह यांच्या घरामध्ये शिरली व घरातील एका खोलीवर कब्जा करून बसली. तिने घरात शिरताना पोलिसांना बोलावले होते. त्यामुळे घरचे लोक सुद्धा काही करू शकले नाही. तिने महिला संघटनांची सुद्धा मदत घेतलेली होती. चार दिवस राहून आल्या वाटेने ती निघून गेली. परंतु या चार दिवसांत त्या कुटुंबाला अनंत यातनांचा सामना करावा लागला व समाजामध्ये बदनामी झाली ती वेगळीच.

आयटी क्षेत्रातील एका मोठ्या कंपनीत नोकरी करणारा व गलेलठ्ठ पगार असलेल्या मुलाचे लग्न झाले. लग्नानंतर दोन-तीन महिन्यांत ती मुलगी तिच्या आई-वडिलांच्या घरी निघून गेली. पुढे तिला मुलगी झाली. आता साधारणतः सात वर्षे झाले तिला घटस्फोट द्यायचा नाही त्यामुळे त्यांचा घटस्फोट अजून झालेला नाही. हिला दुसरे लग्न करायचे नाही व त्यालाही करू द्यायचे नाही त्यामुळे प्रकरण अटकून आहे. ती म्हणते की, मला मिळणारी चाळीस हजार रुपयांची पोटगी ही माझ्यासाठी पर्याप्त आहे. त्यामुळे उगाच दुसरे लग्न करून मी नवीन संकट ओढवू इच्छित नाही. परंतु मला यालाही अटकवून ठेवायचे आहे.

वास्तविकता कायदे हे महिलांच्या संरक्षणासाठी आहेत. आजही समाजामध्ये अनेक ठिकाणी महिलांवर हुंड्यासाठी किंवा विविध मागण्यांसाठी सासरच्या लोकांकडून अत्याचार होतात. एका प्रकरणामध्ये लग्नाला ३५ वर्षे झाल्यानंतर आता नवरा म्हणतो आहे की मला तुला घटस्फोट द्यायचा आहे. तो पत्नीला औषधाला, किराणा आणायला पैसे देत नाही. अशा परिस्थितीमध्ये त्या महिलेला न्यायालयात जाण्याशिवाय आणि कायद्याचा आधार घेतल्याशिवाय काहीही पर्याय नाही. अशा महिलांना कायदा, वकील, महिला संघटना अशा सर्वच लोकांनी योग्य ती मदत करणे गरजेचे आहे. कायदा अशा महिलांसाठीच बनविण्यात आलेला आहे.

मुलीकडचे लोक मुलीची बाजू घेतात व मुलाकडचे लोक मुलाची बाजू घेतात. ते म्हणतात हे चुकले, हे म्हणतात ते चुकले. पटत नसल्यास समुपदेशकांची मदत घेणे गरजेचे असते. लोक न्यायालयात गेल्यावर समुपदेशनामध्ये सहभागी होतात परंतु त्याआधी समुपदेशन करत नाही. प्रकरण वाढल्यावर वेगवेगळे लोक त्यात आपली बुद्धी लावून त्याला सामोपचाराने मिटविण्याऐवजी त्याला अजून वाढवितातच. त्यात काही अर्धवट कायद्याचे जाणकार हे कायद्याचा दुरुपयोग करून विविध प्रकारचे फौजदारी गुन्हे दाखल करायला लावतात. भविष्यात हे गुन्हे न्यायालयात टिकत नाही. परंतु ते गुन्हे रद्द होतपर्यंत किंवा त्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता होतपर्यंत संबंधितांना भरपूर त्रास झालेला असतो.

भारतासारख्या देशात जेथे अशिक्षितपणा, हेवे, द्वेष, ईर्ष्या, मत्सर इत्यादी गुणांचा भरपूर प्रादुर्भाव झालेला आहे. अशा ठिकाणी कायद्यांचा दुरुपयोग होऊ शकतो ही गोष्ट न्यायालयाच्या लक्षात येणे व त्यांनी ती बोलून दाखवणे हे बरेच काही सांगून जाते. निरोगी समाजामध्ये कायदे हे आमच्या कल्याणासाठी बनविलेले आहे असे समजून आपण सर्वांनी त्याचा योग्य तो उपयोग केल्यास कायदा दलित, पीडित, शोषित, महिलांचे रक्षण करण्यास नक्कीच सक्षम ठरेल.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### मनाचे श्लोक एक स्तुत्य उपक्रम

नागपूरचे सांस्कृतिक वैभव असणाऱ्या खासदार महोत्सवात नुकतेच मनाचे श्लोक पठनाचा कार्यक्रम झाला. यात १७५ शाळांमधील २८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि हा एक विश्वविक्रम ठरला. विद्यार्थ्यांच्या मनावर उत्तम संस्कार होणे गरजेचे आहे, या संकल्पनेला या आयोजनाने बळ मिळाले, यात शंका नाही.

जीवनांत धर्मपालन करताना अनेक लहान मोठ्या अडचणी निर्माण होतात. त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन हवे असते. तारतम्य वापरून शास्त्राधारे त्यांना जर मार्गदर्शन मिळाले तर धर्म जागा राहतो. धर्माची सुटसुटीत व्याख्या सांगताना आचार्य म्हणाले, यतः अभ्युदयनिः श्रेयससिद्धिः सः धर्मः । म्हणजे ज्या वागणुकीने इहलोकांत भौतिक समृद्धी व परलोकात मोक्ष प्राप्त होतो त्याला धर्म म्हणावे. या प्रकारच्या आयोजनाने धर्म जागा राहातो यात शंका नाही. भगवद्गीतेत भगवंताची आज्ञाच आहे. नियतंकुरु कर्म त्वं. जीवनाच्या वाटेवर चालताना शास्त्रविधीने नियत केलेले कर्म करणे व ते उत्कृष्टपणे करणे हा संस्कार विद्यार्थ्यांना भावी काळासाठी निश्चितच उपयोगी पडेल. केवळ यशाकरिता कर्म केले तर त्यात स्पर्धा निर्माण होते, ज्यातून लोभ आणि मत्सर यासारखे विकार उत्पन्न होतात. अशा विकारांनी अंतःकरणात चंचलता निर्माण होते. चंचल मन शांत राहू शकत नाही, म्हणजेच सुखही दोन हात दूरच राहते. स्पर्धात्मक युग हे बाह्य जगाशी सुसंवाद साधण्याचे कौशल्य आहे. पण आंतरिक समाधानासाठी मनाचे श्लोक कामी येतात.

मनाचे श्लोक हे समर्थ रामदास स्वामी यांनी भुजंगप्रयात वृत्तात रचलेले आहे. एकाच भुजंगप्रयात वृत्तात एकसारखे प्रवाहाने लिहिल्याने ही रचना वृत्ताच्या दृष्टीने समर्थांचे वैशिष्ट्यच मानावे लागते. फक्त चार लघु अक्षरे असल्यामुळे आठ गुरू अक्षरें अगदी लांबवून मोठ्याने म्हणण्याची उत्तम सोय यात आहे. केवळ स्वतःच्या मनासाठीच नाही तर एकंदर मनुष्यमनाला उद्देशून हे श्लोक लिहिले आहेत असे वाटते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे किती आभार मानावे तेवढे कमी आहेत. या उपक्रमाने एक नवा विश्वविक्रम स्थापित झाला, हे गौरवास्पद आहे.

**अतुल ठाकरे**/९४२२९१०३४७

## वाचक पत्रे

### हिवाळी अधिवेशनात राजकीय विरोध, षडयंत्र अधिक

नवीन सरकारच्या गठनानंतर नागपुरात हिवाळी अधिवेशन झाले. महाराष्ट्रातील जनतेच्या अनेक समस्यांवर चर्चा आणि त्यांचे निवारण करण्यासाठी अनेक मुद्दे घेऊन अधिवेशन सुरू आहे परंतु सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे नेते मंडळी



जनसामान्यांचे प्रश्न सोडून इतर घटित घटनेचे प्रश्न उपस्थित करून अधिवेशन राजकीय चर्चेत वेळ घालवण्याचे चित्र अधिवेशनात दिसले. विरोधकांनी अनेक राजकीय षडयंत्र असलेले प्रश्न उपस्थित केले आणि सभागृहात जनतेच्या समस्या सोडून राजकीय मुद्यांवरच चर्चा पाहावयास मिळाली. राज्यातील जनतेच्या अनेक लहानसहान समस्या आहेत त्यावर योग्य चर्चा होऊन निष्कर्ष, उपाययोजना यावर अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. राज्यातील अनेक क्षेत्रांत अनेक समस्या प्रलंबित आहे. त्याचे ठोस निवारण होण्यासाठी सभागृहात चर्चा करणे अपेक्षित आहे. जनतेचे प्रश्न सोडविणे आवश्यक आहे याची जाणीव सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना असली पाहिजे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

### अवघड प्रश्नांची उत्तरे अवघड असतातच असे नाही

नुकत्याच झालेल्या विधानसभाच्या निमित्ताने ईव्हीएमवर गरळ ओकण्याचे काम सुरू आहे व ते पुढेही चालूच राहील; परंतु त्यामागील गमक काय आहे हे शोधण्याचा प्रयत्न हुशार राजकारणी सातत्याने टाळतात, कारण त्यांना सत्ता प्राप्त करणे खूप कठीण झाले. वास्तविक या निवडणुकीत प्रामुख्याने भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ वेगवेगळ्या विचारधारेने प्रचारात उतरली होती आणि त्याचा मागोवा घेण्याची गरज विरोधकांना वाटली नाही. त्याचेच रूपांतर पराभवात झाले.

ज्यांनी ही निवडणूक यशस्वी करून दाखवली ती मंडळी विजयोत्सवाच्या कोणत्याही कार्यक्रमात नव्हती हे सांगणे गरजेचे वाटते कारण ती मंडळी, ते स्वयंसेवक दिल्ली आणि नंतर होणाऱ्या बिहारच्या निवडणुकीच्या तयारीला पोहोचली असणार. पण मुत्सद्दी विरोधकांना हे समजून घेण्याला वेळच मिळत नाही कारण महायुतीचे सरकार कोणत्या रणनीतीने पाडायचे, एवढाच कार्यक्रम त्यांच्याकडे शिल्लक आहे असे वाटते आणि त्यामुळे विश्लेषक असोत किंवा पत्रकार त्यांची भाटगिरी जोरात चालणार यात नवल नाही. पण सर्वतोपरी काही किमयागारांनी ही मोहीम फत्ते केली यात शंकाच नाही म्हणूनच अवघड प्रश्नांची उत्तरे सोपी ठरली.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए –३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी –८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### वाकोडे कुटूंबियांचे पवार यांच्याव्दारे सांत्वन

**परभणी,/प्रतिनिधी-** आंबेडकरी चळवळीतील अग्रगण्य नेते रिपब्लिकन सेनेचे राज्य उपाध्यक्ष दिवंगत विजय वाकोडे यांच्या कुटूंबियांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते खासदार शरदचंद्र पवार यांनी शनिवारी (दि.२१) दुपारी भेट घेवून त्याांचे सांत्वन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीच्या विटंबनेच्या घटनांच्या, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते पवार हे शनिवारी दुपारी परभणीत दाखल झाले होते. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्या पाठोपाठ पवार यांनी आंबेडकरी चळवळीने सुरु केलेल्या धरणे आंदोलनास भेट दिली. तेथून वाकोडे यांच्या राहुल नगरातील निवासस्थानी जावून वाकोडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन श्रध्दांजली वाहिली. तसेच कुटूंबियांबरोबर हितगुज केले. यावेळी परिवारातील सदस्यांनी घडलेल्या घटने संदर्भात सविस्तर माहिती दिली. आंदोलनादरम्यान पोलिसांनी जाणीवपूर्वक वाकोडे यांच्यावर गुन्हा दाखल केला. वास्तविकतः ते हे संपूर्ण आंदोलन शांततेने हाताळण्याकरीता प्रयत करत होते, हे निदर्शनास आणून दिले. एकंदरीत घडलेल्या घटनेतून, ताणतणावातून आणि पोलीस प्रशासनाने सुरु केलेल्या कठोर कारवाईमुळेच ते अस्वस्थ होते, हेही स्पष्ट केले. त्याामुळेच त्याांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, असेही नमूद केले. वाकोडे हे आयुष्यभर आंबेडकरवादी चळवळीत अग्रभागी होते. छोट्या मोठ्या प्रश्नांवर न्याय हक्काकरीता सर्वसामान्यांच्या हिताकरीता ते शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहिले, असेही कुटूंबियांनी म्हटले. आमच्या परिवाराचे ते कर्ते पुरुष होते. त्याामुळे शासनाच्या वतीने आर्थिक मदत व्हावी आणि एक सदस्याला नोकरीत सामावून घ्यावे, असे परिवारातील सदस्यांनी म्हटले.

### सुर्यवंशी कुटूंबियांचे पवारांव्दारे सांत्वन

**परभणी,/प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि.२१) दुपारी परभणीत मृत सोमनाथ सुर्यवंशी या युवकाच्या कुटूंबियांची भेट घेवून त्याांचे सांत्वन केले.

या भेटी दरम्यान सुर्यवंशी कुटूंबियांनी विधी म हाविद्यालयात शिक्षण घेऊन वकील होवू इच्छिणाऱ्या सोमनाथ याचा या पध्दतीने मृत्यू व्हावा, या बद्दल तीव्र संताप व्यक्त केला. पोलिसांनी हेतुतः सोमनाथ यास दगडफेकीच्या घटनांमध्ये आरोपी केले. विविध कलमे लावली. गुन्हेगारासारखी वागणूक दिली. कोठडीत मारहाण केली. त्याामुळेच सोमनाथ याचा मृत्यू झाल्याचा दावा कुटूंबियांनी केला. या प्रकरणात आम्हास न्याय हवा आहे, अशी भूमिका विशद केली.

दरम्यान, ज्येष्ठ नेते पवार यांनी आपण संपूर्ण वस्तूस्थिती जाणून घेतली आहे. निश्चितच या कुटूंबियांना न्याय मिळण्या संदर्भात सर्वार्थाने प्रयत केले जातील, अशी ग्वाही दिली. आपण राज्य सरकारच्या या साऱ्या गोष्टी निदर्शनास आणून देवू असे ते म्हणाले. यावेळी खासदार निलेश लंके, खासदार बजरंग सोनवणे, माजी मंत्री राजेश टोपे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार ॲड. विजय गव्हाणे, माजी आमदार सुरेश वरपुडकर, माजी आमदार सुरेशदादा देशमुख, माजी आमदार विजय भांबळे, माजी आमदार बाबाजानी दुर्राणी, माजी आमदार सिताराम घनदाट, प्रदेश उपाध्यक्ष भिमराव हत्तीअंबीरे, भगवानराव वाघमारे यांच्यासह अन्य नेतेमंडळी यावेळी उपस्थिती होती.

### साहित्यीक डॉ.बलभीमराज गोरे यांचे निधन

**परभणी,/प्रतिनिधी-** मराठी व हिंदीचे लेखक तथा माजी प्राचार्य डॉ. बलभीमराज गोरे यांचे शुक्रवारी दीर्घ आजाराने छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्याांच्या पार्थीवावर आज शनिवारी (दि.२१) सकाळी ईटखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यासंस्कार करण्यात आले. त्याांच्या पश्चात पती सुनंदा, मुलगा प्रा. भारत, मुलगी डॉ. भारती गोरे व परिवार आहे.

लातूर जिल्ह्यातील कोपरा या गावचे मूळ रहिवाशी असलेले प्रा. गोरे यांनी परभणी जिल्ह्यातील ताडबोरगाव येथे शालेय शिक्षक म्हणून काही काळ सेवा दिली. त्याानंतर येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी महाविद्यालयात हिंदी भाषा विभागात रीडर पदावर त्याांनी काम केले. त्याच काळात त्याांनी विशेष प्रयत करून वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन विषयास मंजुरी मिळवून या विषयासाठी स्वतंत्र विभाग सुरू केला.

छत्रपती संभाजीनगर येथे देवगिरी महाविद्यालयातही त्याांनी काही वर्षे अध्यापन कार्य केले. नंतर तेथेच शिवछत्रपती वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी त्याांची नियुक्ती झाली. सेवानिवृत्तीनंतरही त्याांचे वाचन, लेखन सुरूच होते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या महिंदी सेवा गौरव पुरस्काराफने त्याांचा सन्मान करण्यात आला होता. मराठी-हिंदी साहित्या क्षेत्रात. उल्लेखनीय योगदान दिल्याने त्याांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. मराठी व हिंदी भाषेत त्याांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. भारती गोरे व विवेकानंद महाविद्यालयातील लोक प्रशासन विषयाचे प्रा. भारत गोरे यांचे ते वडील होत.

### ट्रॅक्टरच्या धडकेत ऊसतोड कामगाराचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी-** तालुक्यातील केकरजवळा ते इटाळी रस्त्यावर एका ट्रॅक्टरने मोटारसायकलला दिलेल्या जोरदार धडकेत ऊसतोड कामगाराचा मृत्यू झाला.

करण कैलास शिंदे (रा. दैठणा ता. परळी जि. बीड) हे ऊसतोड कामगार त्याांचे बंधू शिवाजी कैलास शिंदे यांच्यासोबत मोटारसायकलवर केकरजवळा येथून किराणा सामान आणण्यासाठी गेले होते. किराणा सामान घेऊन परत येत असताना एका ट्रॅक्टर चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून शिंदे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# योग शिक्षक मागण्यांबाबत मुख्यमंत्र्याकडे आणि विधिमंडळात पाठपुरावा करणार

## नागपूर येथे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे स्पष्टीकरण

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी:** योग शिक्षक मागण्यांबाबत मुख्यमंत्र्याकडे आणि विधिमंडळात पाठपुरावा करणार असे नागपूर येथे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांचे स्पष्टीकरण करण्यात आले होते. महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने निवेदन देण्यात आले होते.

बदललेल्या जीवनशैलीमुळे माणसाचे आरोग्य बिघडत चालले आहे आणि अशा काळात योग शिक्षक विविध गावांमध्ये तांड्या वस्तीवर जाऊन योगसत्रा मार्फत नागरिकांचे आरोग्य जोपासण्याचे महत्वपूर्ण कार्य करत आहेत. योग शिक्षकांचे हे कार्य आणि मागण्या माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे पोहोचवून हा विषय विधिमंडळात मांडणार असल्याचे स्पष्टीकरण महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री मा. मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी केले.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशन चालू आहे. या दरम्यान महाराष्ट्र योगशिक्षक संघाचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील विविध भागातील योग शिक्षक पदाधिकारी यांनी राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची योग शिक्षक मागण्यांबाबत भेट घेऊन निवेदन दिले. याप्रसंगी राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सदर विषया बाबत स्पष्टीकरण दिले. या निवेदनात महाराष्ट्र राज्यात योग आयोग स्थापन करणे, योग प्रशिक्षक व योगशिक्षक यांचे मानधन वाढवणे, योगसत्रांची संख्या वाढवणे, जाण्या-येण्याकरिता प्रवासी भत्ता देणे, विमा संरक्षण देणे, यांच्यासह बारा मागण्यांचा समावेश आहे. भेट दिलेल्या समितीमध्ये संघटनेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, राज्य कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, आरोग्य वर्धिनीचे राज्य अध्यक्ष गजानन चौधरी, नागपूर विभाग प्रमुख विनायक बारापत्रे, राज्य महासचिव अमित मिश्रा,राज्य उपाध्यक्ष सुपर्णाताई पाल, राज्य उपाध्यक्ष लताताई होलगरे, नागपूर जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम थोटे, महासचिव मनोहर पाल, जिल्हा कोषाध्यक्ष उषाताई हिंदारिया, जनसंपर्क अधिकारी कृणाल महाजन, योग शिक्षण समितीचे अतुल गाळेराव यांचा समावेश होता.

नागपूरला महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांची योग शिक्षक मागण्यांबाबत भेट घेतली. याप्रसंगी संघटनेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, आरोग्य वर्धिनीचे राज्य अध्यक्ष चौधरी तथा राज्यातील विविध विभागातील पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित असल्याचे कळते.





## सेलूमध्ये नागरी सत्काराबाबत बैठक संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी-** नवनिर्वाचीत राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व आमदार राजेश विटेकर यांच्या नागरी सत्काराचे आयोजन संदर्भात बैठक शनिवार २१ रोजी स्वामी रामानंद तिर्थ हिंदी मराठी ग्रंथालय सभागृहात संपन्न झाली.

या बैठकीमध्ये स्वागताध्यक्षपदी माजी आमदार हरिभाऊ लहाने यांची निवड तर सन्मवयकपदी माजी प्राचार्य डॉं.शरद कूलकर्णी यांची निवड करण्यात आली.यावेळी माजी प्राचार्य विनायक कोठेकर,माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे,जयप्रकाश बिहाणी,नंदकिशोर बाहेती,किशोर जोशी रामेश्वर राठी, पंडीत आरकूले,शिवाजी खेडकर,मारोती पंढरकर,रवि मूळावेकर,बाबा काटकर,अविनाश शेरे,डॉं.विलास मोरे,कल्याण पवार,मोहन खापरखूंटीकर,पांडूरंग कावळे,संतोष खाडप आदीसह नागरीकांची उपस्थीती होती.

## सोनपेठच्या दुय्यम निबंधकाची रजा संपता-संपेना

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** खरेदी विक्रीचे दस्तावेज नोंदणी करण्यासाठी असलेल्या सोनपेठ येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रमुख अधिकारी सुनील गायकवाड हे गेली अडीच महिन्यांपासून रजेवर गेले आहेत.त्याामुळे परभणी येथील जिल्हा निबंधक कार्यालयातील लिपिक नितीन वाघमारे यांच्या कडे सोनपेठ चा प्रभारी पदभार दिला असून ते दररोज दुपारनंतर येथील कार्यालयात येत असतात.परिणामी तालुक्यातील नागरिकांचे दस्तावेज नोंदणी सारखे महत्वाची कामे खोळंबली जात आहेत .त्याामुळे सोनपेठ तालुक्याला पूर्णवेळ निबंधक देण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.




महाराष्ट्र शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळवून देण्याचे एकमेव कार्यालय म्हणजे दुय्यम निबंधक कार्यालय आहे. या कार्यालयातून शेती, घर, प्लॉट, मोकळी जागा यांसह अनेक प्रकारच्या खरेदी-विक्री व गहाण खत ची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात केली जाते. सोनपेठ येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचा पदभार प्रभारी दुय्यम निबंधक सुनील गायकवाड यांच्याकडे आहे. मागील अडीच महिन्यापासून गायकवाड हे आरोग्याच्या रजेवर आहेत त्यांचे जागेवर परभणी येथील जिल्हा निबंधक कार्यालयातील लिपिक नितीन वाघमारे यांना प्रभारी पदभार देण्यात आला आहे. परंतु वाघमारे हे दररोजच सकाळपासून दुपारपर्यंत चे कामकाज परभणी येथील कार्यालयात करत असतात व त्यानंतर दुपारी साडेतीन नंतर पुढे दोन तासापर्यंत चे अर्धवेळ कामकाज सोनपेठ येथील कार्यालयात करत आहेत. त्यांचा परभणी येथून ये-जा करण्यात वेळ जात असल्याने नागरिकांची कामे अडकली जात आहेत. वाघमारे यांचे कार्यालयाला दुपारी तीन नंतर येणे हे नित्याचेच झाले आहे तर गायकवाड यांची रजा संपता संपत नाही. त्याामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दुपारी साडेतीन ते चार पर्यंत वाघमारे यांची वाट बघत ताटकळत थांबावे लागत आहे.या गंभीर बाबीकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. सोनपेठ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे तालुक्यातील नागरिकांना दस्तावेज नोंदणीसाठी हेलपाटे घालावे लागत आहेत.या महत्वपूर्ण बाबींकडे परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे लक्ष देतील का? असा सवाल नागरीकांतून उपस्थित केला जात आहे.



**बोरी- नागपूर येथे महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांची योग शिक्षक मागण्यांबाबत भेट घेतली. याप्रसंगी संघटनेचे संस्थापकीय अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी, आरोग्य वर्धिनीचे राज्य अध्यक्ष गजानन चौधरी तथा राज्यातील विविध विभागातील पदाधिकारी दिसत आहेत.**

## जि.प.प्राथमिक शाळा कान्हड येथे शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड



**सेलू,/प्रतिनिधी-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हड येथे शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली.शूक्रवार २० रोजी पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते.
अध्यक्षपदी विष्णू मारोतराव डोंबे,उपाध्यक्षपदी सतीश गंगाधर डोंबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तसेच शिक्षण तज्ञ यशवंत गंगाधर डोंबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीचे सरपंच मारोतराव शेळके, माजी पंचायत समिती सदस्य सचिन डोंबे ,राजेभाऊ डोंबे, पप्पू डोंबे ,नारायण गरड ,अशोक भारशंकर ,शंकर डोंबे, ग्रामपंचायत ऑपरेटर मुंजाभाऊ डोंबे ,शिक्षक ज्ञानोबा वारे ,दिपक सोळंके, संभाजी डमाळे,राधिका मुथा,शेकुराव खोकले मुख्याध्यापक कदम आदींनी अभिनंदन केले.

# साकोरे यांची राज्यमंत्रीमंडळात निवड झाल्याबद्दल ''माथला प्रीमियर लीग''भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित

## सदरील क्रीकेट स्पर्धा आयोजित झाल्यामुळे क्रिकेट संघाच्यावतीने मोठा जल्लोष

**जिंतूर,/प्रतिनिधी:** आ.मेघना साकोरे यांची महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्रीमंडळात निवड झाल्याबद्दल जिंतूरात भव्य अशा क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

आदरणीय नामदार मेघना दिदी साकोरे बोर्डीकर यांची राज्य मंत्रिमंडळात निवड झालेली असल्याने त्याा निमित्ताने ''माथला प्रीमियर लीग''भव्य क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या भव्य क्रिकेट सामन्याचे उदघाटन माजी नगराध्यक्ष मुन्ना गोरे आणि भाजप तालुकाध्यक्ष गोविंद थिटे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले या प्रसंगी आयोजक सुनिल भोंबे, कैलास खंदारे, सुनिल मते, रवी रानबावळे ,भास्कर थिटे, रमेश सडाळ,रामप्रसाद कांठळे,अर्जुन जाधव, अमोल देशमुख,अनिल आप्पा कवठेकर, सरपंच ज्ञानेश्वर राऊत, अजित भोंबे, नामदेव भोंबे, प्रकाश भोंबे, अर्जुन भोंबे, योगेश भोंबे, शाम भोंबे, लखन भोंबे, कृष्णा भोंबे,शरद भोंबे, शंकर भोंबे, मुन्ना भोंबे, शुभम मस्के यांच्या सह स्पर्धेतील सर्व टीम उपस्थित होत्याा.



## क्राईम वृत्त...



### कॅशचा लाभ देण्याची मागणी

**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

एम फिल अहर्ताधारका संदर्भात नागपूर येथे रस्तोगी, सचिव उच्च शिक्षण विभाग व देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण विभाग यांना नागपूर येथील प्राध्यापक शिस्ट मंडळ भेटले. यावेळी एम. फिल. अहर्ताधारकांच्या प्रश्नां संदर्भात युजीसीने सर्व प्रस्ताव स्कृटनी करून शासनाकडे यादया प्राप्त झाल्या असून लवकरच सर्व विद्यापीठांच्या कुलगुरू समवेत ऑनलाईन बैठक घेऊन या संदर्भात ज्या अध्यापकांच्या त्रूटी युजीसीने कळवलेल्या आहेत. त्या विद्यापीठाकडून दुरुस्त करून सर्व यादया युजीसीला पाठवल्या जातील. विद्यापीठाने लकरात लवकर त्रुटींचे निरासन जाईल असे आश्वासन देण्यात आले. यावेळी नागपूर व इतर विभागातील सर्व एम.फील. पात्रता धारक प्राध्यापक उपस्थित होते.



### गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी

**निलंगा, दि.२३ डिसेंबर -**

कर्मवीर राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची ६८ वी पुण्यतिथी निलंगा येथे सकल परीट समाजाच्या वतीने विविध उपक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली. गाडगेबाबा महाराज मंदिर निलंगा येथे आयोजित या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी दीपक आनंतवाळ, काँग्रेस पक्षाचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांब्रे, अंकुश ढेरे, धम्मानंद काळे, बसवराज पाटील, रत्नेश्वर गताटे, आयुब शेख, ज्ञानोबा महाराज पांचाळ, गोपाळ महाराज गायकवाड, सागावे, केशव जाधव, गाडगेबाबा दत्तात्रय शिंदे, विठ्ठलराव जगताप आदी उपस्थित होते. यावेळी संत गाडगेबाबा महाराजांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी महिला व पुरुष भजनी मंडळाची स्थापना करण्यात आली. महिला भजनी मंडळाच्या अध्यक्षपदी सविता जगताप, उपाध्यक्षपदी वंदना शिंदे, सचिवपदी भारतबाई काळे यांचे तर पुरुष भजनी मंडळाचे अध्यक्षपदी रमेश जगताप, उपाध्यक्षपदी हरिभाऊ शिंदे, सचिव पदी सिद्राम हिंगणे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रम ाचे संयोजन व नियोजन सामाजिक कार्यकर्ते महेश काळे यांनी केले होते.



### वलांडी येथे माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील व्यंकटेश विद्यालय वलांडी येथील माजी विद्याचा स्नेह मेळावा पार पडला. २००१ च्या बॅचचे विद्यार्थ्यांनी स्नेह मेळावा व ऋणनिर्देश रविवार २२ डिसेंबर रोजी पार पडला. मित्रत्वाचे ऋणाणूबंध व गूरूजनांप्रति असलेली कृतज्ञता यात सामाजिक तेचे भान जपत दहावीतील वर्गमित्र तब्बल २३ वर्षाने एकत्र जमले. गप्पांची मैफील करीत जून्या आठवणींचा उजाळा दिला. या विद्यालयातील अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी वकील, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, बॅकेत व बिजनेसमन, शेतकरी आदी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. यावेळी मंचावर प्रा.राठोड, बिरगे, कूलकर्णी, बच्चेवार, कोमल, बाजूळगे, धनाजी पाटील, सागर, शंकर पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संध्या मूंजाळ, रेखा गूदळे, महादेवी उमाटे, स्वाती बच्चेवार, सिद्धेश्र्वर खवंदे, लारब पैलवान, शिवहार बिरादार, गिरीश बच्चेवार यांनी परिश्रम घेतले.



### ‘जिव्हाळा’तर्फे दूध जनजागृती अभियान

**उदगीर, दि.२३ डिसेंबर -**

जिव्हाळा ग्रुपतर्फे विश्वनाथराव माळेवाडी कर यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख पाहुणेव मार्गदर्शक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठ नागपूरचे, शिक्षण विस्तार संचालक डॉ. अनिल भिकानेतसेच जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष रमाकांत बनशेळकी कर,शंकरराव साबणे, शंकरराव केंद्रे, दशरथ शिंदे व देविदास नादरगे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या आवाहनानुसार दूध जनजागृती अभियान हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. अनिल भिकाने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वानाथ मुडपे गुरुजींनी केले. तर दशरथ शिंदे यांनी उपस्थिताचेआभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चंद्रकांत रोडगे, चंद्रकांत पांचाळ, लक्ष्मीकांत बिडवे, पांडुरंग बोडके, वैजनाथ पंचगल्ले, हावगीराव आचार्य, अशोकराव बिरादार, नवनाथ पाटील, रामराव मोमले, सच्चिदानंद पुट्टेवाड, संजय कानगुले, वाडेकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

### चंद्रशेखर महाजन यांचे निधन

**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**



देवणी तालुक्यातील वलांडी येथील रहिवासी तथा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर नागप्पा महाजन (वय ५८) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, भाऊ असा परिवार आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे चाकूर नगरीत स्वागत...

# सोसायटीचा चेअरमन ते सहकार मंत्री या अनुभवातून राज्याचा विकास करणार : पाटील



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि.२३ डिसेंबर -**

चाकूर, अहमदपूर मतदार संघातून बाबासाहेब पाटील हे ३१ हजारांच्या लिडने निवडून आले. त्यानंतर महायुतीच्या सरकारने पाटील यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड केली. बाबासाहेब पाटील यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर मतदारसंघात कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी घेण्यासाठी दि.२२ डिसेंबर रोजी मतदारसंघांत आले असता त्यांचे महायुतीतील राष्ट्रवादी, भाजप व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले.

यावेळी फटाकांची अतीषभाजी करून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला व ना. बाबासाहेब पाटील यांची सहकार मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल मतदारसंघात वेगवेगळ्या ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

चाकूर शहरातील राष्ट्रवादी संपर्क कार्यालय, अर्जुन मद्रेवार कृषी दुकान, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सुरज शेटे यांच्या घरी तसेच चाकूर शहरातील विविध ठिकाणी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे, अनील वाडकर, संदीप शेटे, शिवदर्शन स्वामी, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, नगरसेवक भागवत फुले, रामभाऊ कसबे, पपन कांबळे, नरसिंग गोलावार, रविकिरण स्वामी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

माध्यमांशी बोलताना ना. पाटील म्हणाले की, चाकूर अहमदपूर मतदारसंघाला आजपर्यंत कॅबिनेट मंत्री पद कोणत्याही पक्षानी दिले नव्हते पण राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास ठेऊन मतदारसंघाला प्रथमच कॅबिनेट मंत्री पद दिले आहे.

त्यामुळे अजित पवार यांनी ठेवलेला विश्वास मी सार्थ करून दाखवणार आणि मतदारांनी मला भरघोस मतानी निवडून दिल्याबद्दल निवडणुकीवेळी दिलेले आश्वासन पुर्ण करणार असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील माध्यमांशी बोलताना सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर सहकाराची जबाबदारी दिली आहे.

त्यामुळे या राज्यातील एकही घटक सहकारापासून वंचित राहणार नाही याची मी काळजी घेणार असून सहकारामधील ज्या काही त्रुटी आहेत. त्या दूर करणार आहे. लवकरच सहकार क्षेत्रातील तज्ञ मंडळीची कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून सहकार क्षेत्रातील कामागारांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात येणार आहे.

तसेच सहकार क्षेत्रात असलेल्या अडचणीवरही सविस्तर चर्चा करून त्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना. पाटील म्हणाले. सहकारा मध्ये पारदर्शकता आणणार असून विषमुक्त शेतीवर जास्तीत जास्त भर दिला जाणार आहे. सहकारी सोसायटीचा चेअरमन ते सहकार मंत्री असा प्रवास ना. बाबासाहेब पाटील यांचा आहे.

त्यामुळे सहकार क्षेत्रातील आजपर्यंतचा पाटील यांचा अनुभव नक्कीच सहकार क्षेत्राला उभारी देण्यासाठी भविष्यात कामी येईल असा विश्वास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

तसेच राज्यातील सहकार क्षेत्रातील समस्या सहकाराच्या म ुळाशी जाऊन नासोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आ. पवारांच्या हस्ते उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि.२३ डिसेंबर -**

औसा शिक्षण विभाग पंचायत समितीच्या वतीने कुमार स्वामी महाविद्यालय आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते सोमवार दि.२३ रोजी करण्यात आले. या विज्ञान प्रदार्शनात तालुक्यातील १४ केंद्रातील ७८ प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले.

महंत स्वामी शिक्षण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव गिरीश पाटील, गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, कुमारस्वामी महाविद्यालयाच्या प्राचार्या कुसूम ढोणे, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, भाजपाचे शहराध्यक्ष सुनील उटगे, गटशिक्षण अधिकारी गोविंद राठोड, औसा तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे,पंचायत समिती शिक्षण विभागाचे सचिन वळके, आर.के. जाधव, नासिर पठाण, मधुकर कदम, विजय राठोड, किशोर सोनवणे, ज्ञानोबा कांबळे, रविंद्र मोतेवार, रघुनाथ कराड, अबुबकर सय्यद, अर्चना चव्हाण, सुमित्रा दिवे, सविता सानप, अनिरुध्र वाघमारे, निलिमा डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

### तालुक्यातील विद्यार्थी शास्त्रज्ञ व्हावेत : आ. अभिमन्यू पवार

या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतक करीत पुढील काळात माझे जास्तीत जास्त लक्ष शिक्षण विभागाकडे असणार आहे. मतदारसंघातील शाळांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कटिबद्ध असून जिजाऊंच्या नावाने सुरू असलेल्या जिजाऊ माझी शाळा न्यारी शाळा अभियान अधिक व्यापक करण्यात येणार आहे. त्यामधून अधिकाधिक शाळा भौतिक दृष्टीने अत्यंत सक्षम होतील. व भविष्यात विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन म जबूत होऊन आपल्या तालुक्यातुन देखील शास्त्रज्ञ तयार होणार असल्याचा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

औसा तालुक्यातील चौदा केंद्रातून केंद्र स्तरावर विज्ञान प्रदर्शन झाले आहेत. त्यामधून प्रत्येक केंद्रातून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन प्रयोग तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी पात्र ठरले होते. या तालुकास्तरीय दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक स्तरावरील जवळपास ४४ तर माध्यमिक स्तरावरील ३० प्रयोग तर शिक्षकांमधून ४ प्रयोग सादर करण्यात आले आहेत.

# चाकूर येथे १७२ जवानांचा दीक्षांत समारंभ सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि.२३ डिसेंबर -**

लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील सीमा सुरक्षा दलच्या सहाय्यक प्रशिक्षण केंद्राच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज परेड ग्राउंडवर दि.२१ डिसेंबर रोजी १७२ नवीन जवानांचा भव्य शपथविधी समारंभ परेड आयोजित करण्यात आला होता. या शपथविधी परेडची सलामी विनीत कुमार,महानिरीक्षक सहायाक प्रशिक्षण केंद्र, सिमा सुरक्षा दल चाकूर यांनी घेतली.

या नेत्रदीपक परेडचे नेतृत्व नवीन हवालदार हिमांशू यांनी केले. या हवालदारांचे प्रशिक्षण ५ फेब्रुवारी ते २१ डिसेंबर २०२४ पर्यंत ४४ आठवड्यांचे होते. त्यांचे मूलभूत प्रशिक्षण विनीत कुमार, महानिरीक्षक, सहायक प्रशिक्षण केंद्र, सीमा सुरक्षा दल, चाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. यामध्ये महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, बिहार आणि पंजाब या राज्यांतील नवीन जवानांचा सम ावेश आहे. या समारंभात, त्यांच्या प्रशिक्षण कालावधीत उत्कृष्ट काम गिरी करणाऱ्या नवीन जवानांना महानिरीक्षक विनीत कुमार यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.

# प्रेमनाथ विद्यालयाच्या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि.२३ डिसेंबर -**

तालुक्यातील येरोळ जिल्हा परिषद शाळेत ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन घेण्यात आले. यात ३५ शाळांनी सहभाग नोदवला होता. या विज्ञान प्रदर्शनात माध्यमिक गटातून तालुक्यातील थेरगाव येथील श्री प्रेमनाथ विद्यालयातील पांचाळ समर्थ राजेंद्र या विद्यार्थ्याने सादर केलेला प्रयोग द्वितीय आला.

या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान शिक्षक पवार व्ही.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल स्मार्ट सिटी ची संकल्पना आपल्या प्रयोगातून मांडली होती. बक्षीस वितरण अधक्षस्थानी केंद्रप्रमुख बालुरे होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी अनिल पागे प्रश्नाला येरोळचे मुख्यध्यापक निचले माजी केंद्रप्रमुख वाघमारे विषय तज्ञ सुनील गायकवाड उपस्थित होते. गटशिक्षणअधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते विद्यार्थी पांचाळ समर्थ व विज्ञान शिक्षक व्ही. एस. पवार सराना प्रमाणपत्र व पदक देण्यात आले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय शिंदे सचिव बाबुराव पेठे उपाध्यक्ष नारायण पाटील, शंकर पाटील शाळेचे मुख्याध्यापक तांदळे, बेल्लेवाड, कसपटे, चिमनशेटे, सगर, सदानंदे यांनी अभिनंदन केले.

# मुला मुलींनी आई-वडिलांचा सन्मान करावा : उपजिल्हाधिकारी लटपटे

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

पाश्चिमात्य संस्कृतीमुळे भारतीय संस्कृती आणि परंपरा नष्ट होत असून जीवनात सर्वच क्षेत्रात नेत्र दीपक यश प्राप्ती करण्यासाठी प्रत्येकांच्या मनाम नामध्ये आणि घराघरात मुला मुलींनी आपल्या आई-वडिलांचा सन्मान करावा आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गाने म ार्गक्रमण करावे असे आग्रही प्रतिपादन उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे यांनी केले.

त्या यशवंत विद्यालयात अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला शाखा हेलस तालुका मंठा आणि मानस फाउंडेशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लातूर जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धेच्या बक्षीस वितरण प्रसंगी प्रमुख मार्गदर्शिका म्हणून बोलत होत्या. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक विरप्पा भुसनुर, उप मुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक शिवाजी सूर्यवंशी, समन्वयक खयूम शेख, परीक्षक प्रा.डॉ. अनिल मुंडे, परीक्षक प्रा.डॉ. बासू भंडारी, प्रा.डॉ. बालाजी कारामुंगीकर, जिल्हा संयोजक राम तत्तापुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पोलीस निरीक्षक विरप्पा भुसनुर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिस्त आणि संस्काराचे पालन केल्याने जीवन घडते असे सांगितले.

या विजयी स्पर्धकांना उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ, पुष्पहार, सन्मानपत्र स्मृतीचिन्ह, श्यामच्या आईचा ग्रंथ देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते येथे सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संयोजक राम तत्तापुरे यांनी सूत्रसंचालन डॉ. शरद करकनाळे यांनी तर आभार प्रा.डॉ. बालाजी कारामुंगिकर यांनी म ानले.

कथाकथन यशस्वी करण्यासाठी बालाजी सोनटक्के, श्रीधर लोहारे, संतोष पारशेट्टे, राजेश कजेवाड, विजया स्वामी यांच्यासह कथामालेच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अहमदपूर येथे जागतिक ध्यान दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि.२३ डिसेंबर -**

२१ डिसेंबर हा जागतिक ध्यान दिवस अहमदपूर शहरामध्ये साजरा करण्यात आला. येथील डॉ. चेरेकर संकुल येथे जागतिक ध्यान दिवस साजरा करण्यात आला.

पहाटे साडेपाच वाजता डॉ. चेरेकर संकुल येथे ३९ सूर्यनम स्कारासह भगवान बुद्ध यांनी शिकवलेली आनापान साधना ही बुद्ध वंदना व त्रिशरण तसेच पंचशील यासहित घेण्यात आली. तसेच भगवान बुद्ध यांनीच शिकवलेल्या मंगल मैत्री साधनेचा अभ्यास करण्यात आला. या शिबिरासाठी डॉ. मधुसूदन चेरेकर, अशोक तावडे तळणीकर, बाळासाहेब जाधव जिरगेकर, संदेश कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावर्षीपासून संयुक्त राष्ट्र संघाने २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून घोषित केला आहे. त्यानुसार आज पहिलाच जागतिक ध्यान दिवस झाला. ध्यानाचे महत्त्व हे आहे की आयुष्यात येणाऱ्या सुख दुःख, ऊन पावसाळे, लाभ हानी, यश अपयश यांना तोंड देण्याचे धैर्य ध्यानामुळे येते, ध्यानामुळे एकाग्रता वाढते, मनाची प्रसन्नता वाढते, मोक्षाचा मार्ग खुला होतो. तरी सर्वांनी ध्यानाचा अभ्यास केला पाहिजे असे याप्रसंगी डॉ. चेरेकर यांनी सांगितले.

### महिले सोबत छेडछाड; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि.२३ डिसेंबर -**

तालुक्यातील अंबानगर येथे महीले सोबत छेडछाड केल्याची घटना अंबानगर येथे घडली एका विरूद्ध २० डिसेंबर रोजी विनयभंगाचा गून्हा दाखल करण्यात आला आहे. देवणी पोलीसांच्या व तिने मिळालेली अधिक माहिती अशी की, तालुक्यातील अंबानगर येथील शबानाबी शामीद शेख रा अंबानगर फिर्यादीस शेताला जाण्याच्या वाटेच्या कारणावरून शिवीगाळ करून केसाला धरून मारहाण करून उजव्या हाताच्या ब्लाउज फाडून वाईट उद्देशाने हाताला धरून विनयभंग केला व जिवे मारण्याची धमकी दिली.

शबानाबी शामीद शेख (रा. अंबानगर ता. देवणी) यांच्या फिर्यादीवरून आरोपी बहादूर जाफरसाब शेख यांच्या विरोधात गून्हा नोंद करण्यात आला आहे.

# महिलांनी धन व्यवहारासोबत मन व्यवहारात वाढ करावी : पटेल

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि.२३ डिसेंबर -**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा धन व्यवहार वाढला आहे. आता गरज आहे ती म हिलांनी धन व्यवहारासोबत मन व्यवहारात वाढ करण्याची, असे मत महिला आर्थिक विकास म हामंडळ लातूरचे जिल्हा समन्वयक अधिकारी यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन अंगीकृत बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट अंतर्गत झाशीची राणी लोकसंचलीत साधन केंद्र, विणाधारी महिला ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लिमीटेड यांच्या सहकार्याने स्त्री पुरुष संयुक्त मालकी हक्क एक दिवसीय कार्यशाळेत झाली. त्यावेळी ते बोलत होते. विभागीय समाज विकास तज्ञ रोहन कांबळे, सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी माविम लातूरचे दिपक टेकाळे, विनाधारी प्रोड्युसर कंपनीच्या डायरेकटर निर्मला खजूरे, झाशीची राणी लोकसंचलित साधन केंद्राच्या सहसचिव सुनीता खरात, तलाठी वाडेकर, व्यवस्थापक मंगल वाघचौरे सह्योगिनी दैवशाला मुंडे, सरोजा बनसोडे, अश्विनी पाटील, पत्रकार विश्वनाथ गुंजोटे, उपजीविका सल्लगार मंगेश थोरात, जिल्हा कार्यालयाचे विजयसिंह इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पटेल म्हणाले, शेतकरी उत्पादन कंपनी, स्थापना, सदस्य नोंदणी, शेतकरी शेतमजूर यांना संधी, उम ेद, माविम मधील महिलांना संधी, महिलांनी फोन पे, गूगल पे सारखे माध्यम वापरून आर्थिक लेन देन वाढवावी. गटाच्या माध्यमातून विचारांची देवाण घेवाण करावी. धन व्यवहारासोबत मनव्यवहारात वाढ व्हावी. घर सक्षम करावे, उधोग उभारणी करावी. पितृसत्ताक पद्धतीचा उगम कसा झाला, हिंदू वारसा हक्का संबधीचा कायदा. जमीन हस्तांतरणाच्या प्रक्रिया, ७/१२ वाचन, ८ अ, फेरफार काय असतो. त्याचे वाचन कसे करावे, तसेच ७/१२ वर महिलेचे नाव नोंदणी, त्यासाठी लागणारे कागदपत्रे आधी बाबत मार्गदर्शन केले. यावेळी तलाठी वाडेकर, उदयोजक अयोध्या गुंजोटे, आदर्श महिला शेतकरी सुनीता खरात, स्म ार्टचे रोहित कांबळे यांचे मार्गदशन झाले. सुत्रसंचालन संगीता गवळी यांनी केले. तर अश्विनी पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

याप्रसंगी सुरय्या देशमुख व बोरफळ, चिंचोली जोगण, राजेवाडी, तांबरवाडी, किल्लारी, बोरफळ, कारला, जावळी, लखनगाव, उटी, भादा, गुळखेडा, शिंदाळा, काळमाथा, लामजना, आशिव, आदी गावच्या सीआरपी, समन्वयक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोकहितांच्या कामांना प्राधान्य द्या : आ. प्रतापराव चिखलीकर



**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. २२ डिसेंबर**

लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातील लोक विकासाच्या कामाला प्राधान्य देऊन जनतेचे प्रश्न तातडीने मार्गी लावा अशा सूचना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आज झालेल्या समन्वय समितीच्या बैठकीत दिल्या. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली कंधार तालुका समन्वय समितीची आज बैठक पार पडली. या बैठकीत अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

या बैठकीस माजी आ.गुरुनाथराव कुरुडे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण पाटील चिखलीकर, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा परिशिक्षीत मुख्याधिकारी, कंधार अनुष्का शर्मा (खड), बरोबर उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप, तहसीलदार रामेश्वर गोरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता धोतरे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी महेश पाटील, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य बाबुराव केंद्रे, व्यंकट मामडे, एडवोकेट संदीप पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष स्वप्निल पाटील लुंगारे, माजी उपनगराध्यक्ष जफरोद्दीन बाहोद्दीन, सचिन पाटील चिखलीकर, भारतीय जनता पार्टी तालुकाध्यक्ष तथा खरेदी विक्री संघाचे सभापती किशनराव डफडे, कंधार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बालाजी पाटील मारतळेकर, निलेश गौर, चेतन केंद्रे, माजी नगरसेवक बालाजीराव पवार, राजकुमार केकाटे, मामा गायकवाड, माजी नगरसेवक शेख आसिफ, समीर चाऊस, शेख मजर, सय्यद अमजद, सुनील कांबळे, बालाजी दासू पवार, भगवानराव मुंडे, वीरभद्र राजुरे, कैलास नवघरे, बालाजी तोटावाड यांच्यासह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

समन्वय समितीच्या बैठकीत बोलताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी अधिकाऱ्यांना जनतेची कामे करण्याच्या सूचना देत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि रस्ते विकासाच्या प्रश्नाकडेही लक्ष वेधले. कोणत्याही परिस्थितीत आगामी काळात जनतेला पिण्याच्या पाण्याचा त्रास होऊ नये यासाठी स्वतः लक्ष घालावे असा सूचनाही त्यांनी दिल्या. शिवाय ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आहे त्या लाभार्थ्यांच्या घरकुलाच्या उभारणीसाठीही प्रशासनाने तत्परता दाखवावी. नवीन लाभार्थी निवडण्यासाठी ही उपाययोजना कराव्यात अशा सूचनाही आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी दिल्या.

# सचखंड गुरुद्वारा सोने वितळणी प्रकरण

## उच्च न्यायालयाने व्यक्त केली नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ डिसेंबर**

सचखंड गुरुद्वारातील भाविकांनी भेट स्वरूपात दान दिलेले बहुमूल्य दागिने वितळून गैरव्यवहार प्रकरणी रणजीतसिंघ व राजेंद्रसिंघ पुजारी यांनी ॲड. वासिफ शेख यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. यावर उच्च न्यायालयात सुनावणी झाली असता जिल्हा प्रशासनाकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल नाराजी व्यक्त करीत दि.१५ जानेवारी पर्यंत ठोस कारवाई करण्यासाठी मुदत दिली आहे.

सिख धर्मियांची दक्षिण काशी मानल्या जाणाऱ्या सचखंड गुरुद्वारा येथे दरवर्षी हजारो भाविक दर्शन घेतात. श्रद्धेपोटी भाविकांकडून गुरुद्वारा बोर्डाला हिरे-मोती, सोने चांदीचे दागिने भेट स्वरूपात दान केले जातात. अशाप्रकारे १९७० ते २०२० दरम्यान प्राप्त झालेले सोने चांदी वितळून अशुद्ध कमी वजनाचे सोने जमा करून गैरव्यवहार



झाल्याचा संशय याचीकाकर्त्यांना केला आहे.

याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे. या समितीला वर्षभरापेक्षा जास्त कालावधी लोटला तरीही अद्याप ठोस अहवाल न दिल्याने तसेच अजून सहा महिन्याचा वेळ देण्याची मागणी केली आहे. त्यावर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाचे न्यायाधीश मंगेश एस. पाटील, प्रफुल एस. खुबाळकर नाराजी व्यक्त केली. पुढील सुनावणी दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी होणार असून तोपर्यंत स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

# तालुकास्तरीय उल्हास नवभारत साक्षरता मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. २२ डिसेंबर**

केंद्र पुरस्कृत जन जन साक्षर हे घोषवाक्य/ टॅगलाईन आणि नवभारत साक्षरता कार्यक्रमाचे उल्लास अर्थात (Understanding of Lifelong Learning for ll in Society) हे लोकप्रिय नाव असलेल्या उल्लास नभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, शिक्षणाधिकारी योजना दिलीप बनसोडे व गटशिक्षणाधिकारी माहूर तालुका कृष्णा भराडीया यांच्या मार्गदर्शनाखाली माहूर तालुक्यातील जि.प.प्रा.आदर्श शाळा, तुळशी तांडा येथे उल्हास नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत आयोजित मेळावा सोमवार दिनांक २३ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संदीप राठोड , उद्घाटक म्हणून गट समन्वयक संजय खडकेकर यासह, नवभारत साक्षरता कार्यक्रमाचे तालुका समन्वयक संतोष चव्हाण, मनोज पवार,शिक्षक तथा चित्रकार रणजीत वर्मा, हडसणीचे केंद्रप्रमुख विनोद सुरोशे, मुख्याध्यापक सारंग साळुंखे, धनंजय गिऱ्हे, लहू गुरमे, भारत जाधव, मनोज पवार यांचे सह मान्यवरांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

उसंतोष चव्हाण यांनी तालुक्यात अनेक ठिकाणी सदरील कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याने प्रत्येक ठिकाणी या कार्यक्रमास गावकऱ्यांसह माता, पालक, विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होत असून, तुळशी गावातील मान्यवरांसह पालकांसमक्ष झालेल्या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली संस्कृती, लोककला, सण उत्सव, वेशभूषा, महोत्सव, खाद्यपदार्थ, ग्रामीण भागातील तील राहणीमान, वडिलधाऱ्यांचा मानसन्मान यासह अनेक विषयांवर प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी संजय खडकेकर यांनी उपस्थित माता-पालक बालकांना मुलांच्या शैक्षणिक विकासाबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तर संतोष चव्हाण यांनी उल्हास नवभारत साक्षर कार्यक्रमाबद्दल उपस्थित माता पालक आणि बालकांना सविस्तर माहिती दिली.

# सि.सी.आय केंद्रावर शेतकऱ्यांची अडवणूक

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २२ डिसेंबर**

मनजित कॉटन जिनिंग येथे शासनाकडून सि.सी. आय.केंद्र सूरु केले असून सदरील सि.सि.आय.केंद्राचे ग्रेडर शेतकऱ्यांचा कापूस घेण्यास टाळाटाळ करीत असल्याने खाजगीमध्ये विक्रि करण्याचा सल्ला ग्रेडरकडून मिळत असल्याने या केंद्राची चौकशी करण्याची मागणी मसलगा येथील शेतकरी गणपत राठोड यांनी सहाय्यक निबंधक यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद केले कि,मनजित कॉटन जिनिंगमध्ये सि.सि.आय. केंद्र सूरू असून या केंद्रावर शेतकरी गणपत राठोड यांनी कापूस घेवून गेल्यानंतर सदरिल सि.सि.आय.च्या ग्रेडरने सदरिल शेतकऱ्यांचा कापूस घेण्यास टाळाटाळ करुन मी तूमचा कापूस घेत नाही खाजगीमध्ये द्या असा सल्ला ग्रेडरकडून शेतकऱ्यांना मिळत असल्याने सदरिल सि.सि.आय.केंद्रावरील भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी मसलगा येथील शेतकरी गणपत राठोड यांनी सहाय्यक निबंधक यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# मार्गशीर्ष पौर्णिमा उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २२ डिसेंबर**

तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात मार्गशीर्ष पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने पौर्णिमोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत विविध कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघ, साहित्यिक राज गोडबोले, माधवदादा जमदाडे , साहेबराव इंगोले, एस. एच. हिंगोले, विनायक लोणे, एस. एन. गोडबोले, प्रल्हाद इंगोले, प्रज्ञाधर ढवळे, निवृत्ती लोणे आदींची उपस्थिती होती.

ऋषीपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात महिन्याच्या दर पौर्णिमेचे औचित्य



साधून पौर्णिमोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. सकाळपासूनच सुरू झालेल्या या पौर्णिमोत्सव कार्यक्रमात परित्राणपाठ, भिक्खू संघाचे भोजनदान, बोधीपुजा, त्रिरत्न वंदना, गाथापठण, भोजनदान, आर्थिक दान, औषधी तथा विविध वस्तूंचे दान, धम्मदेसना, बुद्ध भीम गितांच्या गायनाचे कार्यक्रम संपन्न झाला. याच परिसरात श्रामणेर धम्मसंकल्प दीक्षाभूमीचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर होत आहे. यासाठी आर्थिक दानाचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य साहेबराव इंगोले यांनी तर आभार श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले. शहरातील श्रद्धा कॉलनी येथील उपासिकांच्या वतीने भोजनदान देण्यात आले. या निमित्ताने कार्यक्रमास मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव ग्यानोबा सावरकर यांच निधन

**नांदेड**-येथील सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव ग्यानोबा सावरकर (७५)



यांचे नांदेड येथे आज भोईगल्ली सराफा येथील त्यांच्या निवासस्थानी दुपारी निधन झाले. काही दिवसापासून ते आजारी होते. वेगवेगळ्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात काम करणारे सेवानिवृत्त शिक्षक विठ्ठलराव सावरकर यांचे निधन झाले. काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर उद्या दि.२४ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता तारातीर्थ घाट चौफाळा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावाई, नातू असा परिवार आहे. दैनिक सामनाचे वितरण प्रतिनिधी आनंद सावरकर यांचे ते वडील होत.

### जयराम पेटेकर यांचे निधन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम खतगांव येथील सुप्रसिद्ध खाजगी छायाचित्रकार जयराम मण्णाजी पेटेकर (३५)यांचे अल्पशा



आजाराने दि.२३ डिसेंबर रोजी सोमवारी सकाळी सव्वा नऊ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२३ डिसेंबर रोजी सोमवारी दुपारी २ वाजता शोकाकुल वातावरणात खतगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी,एक मुलगा,एक मुलगी, भाऊ, भावजय, बहीण,भावोजी असा मोठा परिवार आहे.धनगर समाज युवा मल्हार सेना बिलोली तालुकाध्यक्ष गोविंद पेटेकर खतगांवकर यांचे ते बंधू होत.

# तेंव्हा डीएड कॉलेज आणले आता मेडिकल कॉलेजसाठी प्रयत्नशील



**विकास कामाच्या जोरावर किनवट माहूर विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी मला दुसऱ्यांदा या भागाचे नेतृत्व करण्याची संधी दिली या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने मी विकास कामांना प्राधान्य दिले आहे माझ्याच काळात किनवट सारख्या मागा दुर्गम भागात डीएड कॉलेज उपलब्ध झाल्याने हजारो विद्यार्थी शिक्षक झाले आता मेडिकल कॉलेजसाठी प्रयत्न करणार असे आश्वासन आ भीमराव केराम यांनी दिले आहे.**

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २२ डिसेंबर**

किनवट विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा आमदार म्हणुन निवडून आल्यानंतर सरस्वती शिक्षण संस्थेच्या वतीने २३ डिसेंबर रोजी कलावती गार्डन येथे आमदार भीमराव केराम यांच्या सत्कार सोहळा आयोजित केला होता त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. मंचावर माजी नगराध्यक्ष ईसाखान सरदार खान, गंगणाजी नेम्मानीवार, व्यंकटराव नेम्मानीवार, आनंद मच्छेवार, दत्ता आडे, देवराव गोणेवार, नरसिंग सातूरवार, कृष्णकुमार नेम्मानीवार, मुकुंदराव श्रीमनवार, संजीवरेड्डी येल्टीवार, बबलू नाईक, प्रा. विश्वास कोल्हारीकर यांची उपस्थिती होती.

किनवटच्या शैक्षणिक विकासाचा विचार करता सरस्वती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने किनवट माहूर तालुक्याच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. दर्जेदार शिक्षण पद्धतीमुळे या कॉलेजचे हजारो विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर झाले. त्यावेळी डी. एड. ला अनन्यसाधारण महत्त्व होते ही निकड लक्षात घेऊन मी डीएड कॉलेजसाठी पाठपुरावा केला आणि मला यश लाभले. सरस्वती शिक्षण संस्थेत डीएड कॉलेज उपलब्ध झाल्यामुळे त्या वेळेचे जवळपास सर्वच विद्यार्थी शिक्षक झाले. हे मला अभिमानाने सांगावे वाटते. डी.एड. कॉलेज नंतर आता मेडिकल कॉलेजसाठी मी कसोशीचे प्रयत्न करेन असे आश्वासन आ.केराम यांनी दिले आहे. यावेळी सरस्वती शिक्षण संस्थेचे प्राध्यापक शिक्षक व कर्मचारीवृंद यांच्यावतीने अध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार यांनी आ भीमराव केराम यांचा भव्य पुष्पहार घालून येथोचित सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिश्रा सर यांनी केले तर राधिका तिरमनवार यांनी आभार प्रदर्शन केले या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाला भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शाळेचे प्राध्यापक,शिक्षक, कर्मचारीवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ग्रामपंचायतच्या वतीने दिंव्यांगाना मिक्सर वाटप



### पाथरड ग्रामपंचायतिच्या वतीने १८ दिव्यांग बांधवांना मिक्सर वाटप

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २२ डिसेंबर**

रेल्वे स्टेशन पाथरड येथील ग्रामपंचायतच्या वतीने १८ दिव्यांग बांधवांना ५% निधितुन मिक्सर वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी पाथरडचे सरपंच कैलास पाटील उपसरपंच जयवंत थोरात ग्रामसेवक वाघमारे तथा प्रहार तालुका अध्यक्ष अनिल पा.शेटे व महिला अध्यक्षा केशरताई शिंदे पा.यांच्या हस्ते पाथरड येथील १८ दिव्यांग बांधवाना ५% निधितुण (मिक्ससर) वाटप करण्यात आले. प्रहार दिव्यांग संघटनेचे तालुकाध्यक्ष यांनी सांगीतले की प्रहार संघटनेचे एकचं उदिष्ट आहे.

मुदखेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीने दिव्यांगाना ५% निधी विपरीत करुन सहकार्य करावे अशी विनंती संबधित अधिकारी यांना केली आहे.यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व सामाजिक कार्यकर्ते आणि दिव्यांग बांधवांची उपस्थिती होती.

# उर्जेची बचत हेच उर्जेचे संवर्धन - गंगाधर ढवळे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २२ डिसेंबर**

दैनंदिन जीवनात मर्यादित उर्जा वापरून आणि आपल्या भावी पिढीच्या चांगल्या भविष्यासाठी पारंपारिक स्त्रोतांचे शोषण थांबवून अपारंपारिक ऊर्जाचा वापर वाढूविला पाहिजे. सूर्य हा उर्जेचा अपारंपरिक स्त्रोत आहे. त्यापासूनच प्रेरणा घेऊन मानवाने उर्जेची निर्मिती केली आहे. त्यामुळे उर्जेची बचत हेच उर्जेचे संवर्धन होय, असे मत मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनी व्यक्त केले. जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत राष्ट्रीय उर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेप्रसंगी ते बोलत होते. विज्ञान विषय शिक्षक उमाकांत बेंबडे यांच्या कल्पकतेतून 'उर्जेची बचत आणि संवर्धन' हे विषय देऊन शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. यावेळी माजी सरपंच साहेबराव शिखरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशनराव गच्चे, बालाजी झिंझाडे, आनंदा गोडबोले, मनिषा गच्चे, हैदर शेख, संतोष घटकार, हरिदास पांचाळ, इंदिरा पांचाळ, पांडुरंग गच्चे आदींची उपस्थिती होती. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिन १४ डिसेंबर आणि ऊर्जा संवर्धन सप्ताह १४ ते २० डिसेंबर पर्यंत साजरा करण्याचे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सर्व कार्यालयांना दिले होते. हा उर्जा संवर्धन दिन व सप्ताह साजरा करीत असताना जनजागृती, शालेय स्तरावर चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

# कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही : हेमंत पाटील



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २२ डिसेंबर**

शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषद गट नेते हेमंत पाटील यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त ५५ क्विंटल साखर वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन बालाजी पाटील भालेगावकर यांनी दि. २३ डिसेंबर रोजी चंदासिंग कॉर्नर येथे ५५ क्विंटल साखरेचे वाटप करून हेमंत पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला याप्रसंगी हेमंत पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही असे मत व्यक्त केले.

विधान परिषद गटनेते हेमंत पाटील यांच्या ५५ वाढदिवसानिमित्त दि. २३ डिसेंबर रोजी चंदासिंग कॉर्नर येथे ५५ क्विंटल साखरेचे वाटप आयोजक बालाजी बायगावकर यांनी करून हेमंत पाटील यांचा वाढदिवस साजरा केला. याप्रसंगी आ. आनंदराव बोंढारकर म्हणाले की, आ. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही एक निष्ठेने कार्य केलं त्याचा फायदा झाला. तुमच्या नेतृत्वाने आज ये चित्र सर्व भगवेमय झाले आहे. या जिल्ह्याचे चित्र आम्ही पुढील पाच वर्षात बदलून टाकू असे मत आ. आनंदराव बोंडारकर यांनी व्यक्त केले. तर या कार्यक्रमाप्रसंगी हेमंत पाटील यांनी सांगितले की ''जो माणूस कठोर परिश्रम करतो तो आयुष्यात यशस्वी होतो'' त्यासाठी श्रद्धा आणि सबुरी ठेवायला हवी असते आणि याच विधानाचे श्रेय आनंदराव बोंढारकर यांना गेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की; परिश्रमाशिवाय पर्याय नाही जो परिश्रम करतो तो यशस्वी होतो. या त्यांच्या तत्त्वावर चालत असताना कालपर्यंतचा गावकुसाबाहेर राहणारा समाज आज कठोर परिश्रमाने हजारो अधिकारी, साहित्य, संगीतकार अशा अनेक विविध क्षेत्रात काम करीत आहेत. हे केवळ कठीण परश्रमाने शक्य झाले आहे. असे मत हेमंत पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी आ. आनंदराव बोंढारकर, दत्तात्रय पईतवार, तुलजेश यादव, उद्धव शिंदे, सुहास खराणे, श्याम वानखेडे, संभाजी बळीरामपुरकर, आशोक वागीकर, बबनराव कदम यांची उपस्थिती होती. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम पवार वाहे गावकर यांनी केले तर या प्रसंगी उपस्थित असलेल्या शेकडो नागरीकांना ५५क्विंटल साखरेचे वाटप करण्यात आले.

# संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना अटक करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २२ डिसेंबर**

मस्साजोग तालुका केज जिल्हा बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यास तात्काळ अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सहाय्यक जिल्हा अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दंडाधिकारी व पोलीस स्टेशन कार्यालय किनवट येथे निवेदन देण्यात आले.

संतोष देशमुखांची हत्या करणाऱ्या सर्व आरोपीस तात्काळ अटक करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी उपविभागीय अधिकारी किनवट यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना करण्यात आली. या निवेदनावर सुरेश सोळंके, सचिन कदम, आकाश इंगोले, अजय कदम, संतोष डोंनगे, विक्रम पवार, वैभव हजबे, बबन वानखेडे. बाळासाहेब यादव, दत्ता नरवाडे, बालाजी अनकाडे, नंदकिशोर जामग, उमाकांत कराळे, सुमित मान, शिवा पवार, संदीप कदम, कृष्णा बेराड आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# प्रत्येक कार्यालयाचा महिन्यातील एक तास उपलब्ध करून देणार : तहसीलदार राहूल बनसोडे

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ : अखिल भारतीय ग्राहक पंचायत, तहसील कार्यालय व पुरवठा विभाग पैठणच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. सोमवारी तहसील कार्यालयाच्या सभागृहात ग्राहक दिनानिमित्त स्वामी विवेकानंद प्रतिमा पुजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

यावेळी ग्राहक संरक्षण परिषद सदस्य नानक वेदी यांनी प्रस्तावनेत ग्राहक पंचायतच्या ५० वर्षातील ग्राहक चळवळीचा आढावा सांगितला तर अभ्यास मंडळ प्रमुख राजन सातघरे यांनी नवीन फसवणुकीचे आव्हानासमोर ग्राहक लुटल्याची माहिती दिली. पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी सायबर सुरक्षेबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले.

यावेळी तालुका अध्यक्ष रामचंद्र आहुजा, मदन आव्हाड, पुरवठा निरिक्षक कैलास बहुरे, वजन मापे निरिक्षक वानखेडे , दराडे, कलीम पठाण, अशोक ठोबरे यांनी आरोग्य, वजन मापे, एस टी महामंडळ, विजवितरण, नगर परिषद, रेशन दुकान, अन्न, औषध प्रशासन विभागाबाबत मार्गदर्शन व सूचना मांडल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राहूल बनसोडे यांनी अखिल भारतीय ग्राहक पंचायतसाठी तालुक्यातील प्रत्येक शासकीय कार्यालयात महिन्यातील कमीतकमी एक तास राखीव ठेऊन आलेल्या सुचना अथवा तक्रारींचा निपटारा करण्याचे आश्वासन दिले .

यावेळी नायब तहसीलदार घुगे, नायब तहसीलदार पुरी, पोलीस उपनिरिक्षक औदुंबर मस्के, रेशन दुकानदार संघटनेचे नरेश खोचे, इंडेन गॅस एजेंसीचे नवनीत तोतला, विष्णू सोनार, जगन्नाथ जमादार, प्रतिसाद संघटनेचे भास्कर पाचोडे, शाम पंजवानी, राजीव शिंदे, हरीश शिंदे, प्रदीप गायके आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन तालुका संघटक विष्णू ढवळे यांनी तर आभार प्रदर्शन कुणाल पिंपळे यांनी केले.

# राष्ट्रीय ग्राहक दिन कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयात साजरा



तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२३ डिसेंबर - महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग छत्रपती संभाजी नगर तहसील विभाग कन्नड यांच्यावतीने कर्मवीर काकासाहेब देशमुख विद्यालय कन्नड येथे तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या अध्यक्षतेखाली व कन्नड तालुका राष्ट्रीय ग्राहक समितीचे अध्यक्ष रोहित पिरथानी, उपाध्यक्ष सुनील जैन सचिव नंदकुमार शेजवळ, मार्गदर्शक अडवोकेट स्वप्निल उपासनी, नायब तहसीलदार निलेश राठोड, पुरवठा निरीक्षक अधिकारी वैभव तोंडे, अन्नसुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सचिन राऊत व खिल्लारे , एसटी महामंडळाचे बीएम सुर्वे साहेब, तालुका कृषी कार्यालयाचे मंगेश राठोड व अनंत राहणे ,विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र पाटील पर्यवेक्षक देविदास चौधरी वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव यांची उपस्थितीत

राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय ग्राहक दिन या निमित्ताने तालुक्यातील विविध शासनाच्या उपक्रमांतर्गत चालवण्यात येणाऱ्या सेवा सुविधा उपक्रम कार्यालय यांच्यावतीने ग्राहक दिनानिमित्त विविध स्टॉल माहिती पत्र भित्तिपत्र लावून योजनांची माहिती देण्यात आली. यामध्ये तालुका कृषी कार्यालय कन्नड, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कन्नड व पिशोर, अन्नसुरक्षा कार्यालय कन्नड, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आगार कन्नड, शासनाच्या विविध योजना विषयी सविस्तर माहिती देऊन राष्ट्रीय ग्राहक सहभागी होऊन यशस्वी सहभाग नोंदविला.

यावेळी एडवोकेट स्वप्निल स्वप्निल उपासनी यांनी राष्ट्रीय ग्राहक दिन कायदा १९८६ व सुधारित कायदा २०१९ यांची माहिती सांगून ग्राहकांचे हक्क व सुरक्षा याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष समारोप करताना तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने सर्व ग्राहकांनी आपले हक्काच्या प्रती जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे. खरेदी करताना चिकित्सकृती ठेवून फसव्या जाहिराती पासून आपण सावध राहिले पाहिजे असे सांगितले. व विद्यार्थ्यांना स्वयंपूर्ण स्वावलंबन व स्वप्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी हे गुण अवलंबले पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक रवींद्र पाटील यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकारी सोसायटीमध्ये झाले संगणकीकरण !

## ६० सेवा सहकारी सोसायट्यांना मिळाले संगणक संच

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.२३ डिसेंबर - तालुक्यातील १०० विविध कार्यकारी सोसायटी पैकी ६० सोसायट्यांना संगणक प्राप्त झाले असून संपूर्ण सोसायटी संगणीकृत होण्यासाठी अजून ४० सोसायट्या संगणकाच्या प्रतीक्षेत आहे.

सेवा सहकारी सोसायट्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने डिजिटलायझेशनचा उपक्रम हाती घेण्यात आला असून. त्याअंतर्गत ६० संस्थांचे संगणकीकरण होणार आहे. पहिल्या टप्प्यात २६ सेवा संस्थांना संगणक देण्यात आले तर दुसऱ्या टप्प्यात दि.१९ डिसेंबर रोजी ३४ सोसायट्यांना संगणक संच दिले आहेत. अजूनही ४० संस्थांना संगणकाची प्रतीक्षा असली तरी जिल्ह्यातील ३०५ सोसायट्यांन पैकी सर्वाअधिक ६० संगणक कन्नड तालुक्याला मिळाले असून उर्वरित संस्थेला लवकरच मिळणार असल्याची माहिती सहायक निबंधक विनय धोटे यांनी दिली.

सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण असलेल्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या आर्थिक स्रोतांअभावी डबघाईस आल्या आहेत. या सोसायट्यांना शासनाच्यावतीने सुमारे वर्षभरापासून डिजिटलायझेशनची कास धरून आर्थिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत.

त्याअंतर्गत बी-बियाणे, विक्रीचा परवाना, औषधी विक्री, ऑनलाइन केंद्र सुरू करण्यात येणार आहे. यातून सोसायट्यांची आर्थिक बाजू सावरण्यास मदत होणार आहे. या साठी तालुक्याला ६० सोसायट्यांना संगणकासह इतर आवश्यक त्या साहित्याचा पुरवठा करण्यात आला असून विद्या ऑनलाईन प्रायव्हेट लिमिटेड ह्या कंपनीचे कर्मचारी संगणक जोडणी करून त्या त्या सोसायट्यांचा डाटा संगणकात अद्यावत करून सचिवांच्या ताब्यात हे संगणक देत आहे हे सर्व काम शासन स्तरावरून चालू असले तरी मात्र पुढील कामकाजांसाठी ग्रामीण भागात कनेक्टिव्हिटीचा अडथळा निर्माण होणार आहे.सोसायट्यांचे संगणकीकरण करण्याची प्रक्रिया वर्षभरापासून हाती घेण्यात आली होती. त्यानंतर पहिल्या टप्प्यात २६ तर दुसर्या टप्प्यात ३४ सोसायट्यांना संगणक, प्रिंटरसह इतर साहित्य देण्यात आले.

भविष्यात या सर्व सोसायट्यांचा डाटा एकत्रितपणे सहायक निबंधक कार्यालयाशी जोडला जाणार असल्याने तालुक्यातील सर्व सोसायट्यांची एकत्रित माहिती याच कार्यालयात उपलब्ध होणार त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहे.

# बिडकीन हद्दीतील सोमपुरी येथील कोयता हल्ला प्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल - तीन आरोपींना अटक

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २३ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याचे हद्दीतील सोमपूरी येथील काही युवकांना जुन्या वादाच्या कारणावरून तुंबळ हाणामारी करत नंतर कोयत्याने हल्ला प्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात दि २२ रविवार रोजी सायंकाळच्या सुमारास तौफीक रफीक शेख वय ३२ वर्ष व्यवसाय. शेती, रा. सोमपुरी ता. पैठण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसात तक्रार दाखल केली आहे.तौफीक रफीक शेख यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, दि १९ डिसेंबर रोजी आम्ही आणलेल्या गट क्रं १३३,व १३८ जामिनीची मोजणीमध्ये तुमचे काही काम नसताना तुम्ही का आले या कारणावरुन गैरेकायद्याची मंडळी जमऊन दबा धरुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने माझ्यावर अचानक कोयता, लोखंडी रॉड व लाकडी दांड्यानी प्राणघातक हल्ला केला असे तक्रारीत नमूद केले आहे.या फिर्यादीवरून आरोपी रकीब रशीद पठाण,जावेद रशीद पठाण,अजीम अफजल शेख, गब्बु शहानुर शेख,समीर युसूफ शेख ,नाजीम अफजल शेख, सलीम अफजल शेख,अफजल फतरु शेख यांच्याविरुद्ध १०९, १२६(२), १८९(२), १९१(२),१९१(३),१९० प्रमाणे विविध कलमानुसार नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने व पोलीस कर्मचारी करित आहेत.सदरच्या गुन्ह्यातील तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके,पोलीस उपनिरीक्षक अशोक माने यांनी दिली आहे. व फरार असलेल्या आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल असे निलेश शेळके यांनी सांगितले.

# रागाच्या भरात घर सोडून गेलेल्या अल्पवयीन मुलीला कन्नड शहर पोलिसांनी २४ तासात आणले परत



तभा वृत्तसेवा

कन्नड, दि.२३ डिसेंबर - आई रागावल्याने रागाच्या भरात सोळा वर्षीय अल्पवयीन मुलगी घर सोडून गेल्याची घटना दि २० रोजी घडली होती

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील भोलेश्वर कॉलनीतील रहिवासी असलेली अल्पवयीन मुलीला आई रागावल्याने तिने कोणाला काही एक न सांगता घरातून रागाच्या भरात निघून गेली तिची सगळीकडे शोधा शोध केली असता ती मिळून न आल्याने अखेर आईच्या फिर्यादीवरून कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये बेपत्ता असल्याची नोंद दि.२० रोजी करण्यात आली घटनेचा तपास पोलिस निरीक्षक आर. वी.सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी, पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी यांच्या कडे येताच त्यांनी तपासाची सूत्रे फिरवत तांत्रिक तपासाच्या साहाय्याने अल्पवयीन मुलीचा छत्रपती संभाजीनगर येथे शोध लावला आणि दि.२२ रोजी रात्री उशिरा पालकांच्या स्वाधीन केले,

अवघ्या २४ तासांत अल्पवयीन मुलीला शोधून दिल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले या अगोदर सुद्धा तांत्रिक तपासात कन्नड शहर पोलिसांनी आघाडी घेतली आहे,या पथकात सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सुर्यवंशी, पोलिस कॉन्स्टेबल विजय चौधरी, महिला पोलिस कर्मचारी मंगल ठाकरे हे होते.

# एमजीएमचे प्रा.डॉ.अरविंद चेल यांना मिळाला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध सादरीकरण पुरस्कार

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या यांत्रिक विभागाचे विभागप्रमुख डॉ.अरविंद चेल यांच्या ई-कचऱ्यापासून धातू काढणे: एक शाश्वत दृष्टिकोन आणि शाश्वत ई-कचरा व्यवस्थापन: वर्तमान आणि भविष्यातील दृष्टीकोन या राष्ट्रीय परिषदेत सादर करण्यात आलेल्या शोध निबंधास सर्वोत्कृष्ट सादरीकरण पुरस्कार प्राप्त झाला आहे.

दिनांक २० डिसेंबर २०२४ ते २१ डिसेंबर २०२४ दरम्यान महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ औरंगाबाद आणि जैवतंत्रज्ञान विभाग, शासकीय विज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय परिषदेत डॉ. चेल यांना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट शोध निबंध सादरीकरण हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या राष्ट्रीय परिषदेत ई-कचरा समस्येवर लक्ष केंद्रित करणारे विज्ञान आणि कायदेशीर हस्तक्षेप यावर लक्ष केंद्रित केले आहे.

भारत सरकारच्या विज्ञान आणि अभियांत्रिकी संशोधन मंडळाद्वारे (डएठइ) अनुदादित




असलेल्या संबंधित प्रकल्पासाठी प्रकल्प अन्वेषक म्हणून डॉ. अरविंद चेल यांनी संशोधन केले आहे. हा प्रकल्प संशोधन अभ्यासक अभय व्ही. वावरे, संशोधन सहयोगी आकाश वाणी, एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर आणि पर्यावरण सल्लागार डॉ. गीतांजली कौशिक यांच्यासमवेत राबविला जात आहे.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. चेल यांचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.एच.एच. शिंदे, प्राचार्य डॉ. विजया मुसांडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कॅम्पचा लाभ घ्यावा : डॉ.सुदाम लग्रास

## उपजिल्हा रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर पुर्ववत सुरू

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२३ डिसेंबर: येथील उपजिल्हा रुग्णालयातील ऑपरेशन थियटर चालू झाले असून कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करण्यासाठी प्रत्येक गुरुवारी ऍडमिशन व शुक्रवारी कॅम्प होणार आहे. गरजू लाभार्थी रुग्णांनी या कॅम्प चा लाभ घ्यावा व इतर रुग्णांना करून द्यावा असे आवाहन उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर सुदाम लगास, तसेच उ्डड- मेंबर गंगापूर न्यायालय,रुग्ण कल्याण समिती सदस्य अतुल रासकर यांनी केले आहे.

# सोयगाव तहसील कार्यालय येथे राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्याचे आयोजन

सोयगाव,दि.२३ डिसेंबर : सोयगाव तहसील कार्यालय येथे दि.२४ मंगळवार रोजी १२:०० वा.राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करायचा आहे.तरी सर्वांनी कार्यक्रमास येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी अशी विनंती तालुका अध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य प्रभाकर कुलकर्णी यांनी केले आहे.

# सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव येथे मोटारसायकल गॅरेज आगीत भस्मसात;-सहा लाखांचे नुकसान; रात्री दोन वाजेची घटना

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२३ डिसेंबर

सोयगाव तालुक्यातील गोंदेगाव चौफुली वर असलेल्या स्वामी समर्थ ऑटो गॅरेजला शनिवारी रात्री दोन वाजेच्या सुमारास अचानक आग लागून गॅरेजच्या दुकानाचा अक्षरशः कोळसा झाला आहे दरम्यान घटनास्थळी तातडीने पाचोरा येथील अग्निशमन दलाला पाचारण केल्या मुळे आग आटोक्यात आली त्यामुळे शेजारची दुकाने आगीच्या विळख्यातुन वाचली आहे.

गोंदेगांव येथील बनोटी चौफुलीवर असलेले मंगलसिंग त्रंबक पवार यांचे श्री स्वामी समर्थ ऑटो गॅरेजला काल सायंकाळी दुकान मालक मंगल सिंग पवार हे नियमित पणे दुकान बंद करून



घरी गेले मात्र रात्री दोन वाजेच्या सुमारास अचानक त्यांच्या दुकानात आग लागल्याचा त्यांना फोन आल्या ने त्यांनी तातडीने दुकानाकडे धाव घेतली परंतु तोपर्यंत आगीत दुकान कोळसा झाला होता या घटनेत एक मोटारसायकल सह दुकानातील दुचाकीचे स्पेअर पार्ट,बॅटऱ्या,हायड्रॉइक पंप,व फर्निचर जळून खाक झाले त्यात त्यांचे सुमारे सहा ते सात लाखाचे नुकसान झाले आहे.रविवारी सकाळी मंगलसिंग पवार यांनी सोयगाव पोलीस ठाण्यात अर्ज दिला.दरम्यान आगीचे लोळ उंचचा उंच दिसुन येत होते त्यामुळे आग नियंत्रणात आणण्यासाठी घटनास्थळी कोणत्याही सुविधा नव्हत्या त्यामुळे पाचोरा जि.जळगाव येथील अग्निशमन दलाच्या पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले रात्री तीन वाजता अग्निशमन दल घटनास्थळी येऊन आग आटोक्यात आणली परंतु आगीत सर्वच साहीत्य जळून खाक झाले आहे.

**शेतकऱ्याचा ७५ क्विंटल कापूस बचावला**

दरम्यान गॅरेजच्या शेजारीच एका शेड मध्ये एका शेतकऱ्याचा ७५ क्विंटल कापूस होता आग नियंत्रणात आल्या मुळे या शेतकऱ्याचे सुदैवाने नुकसान टळले आहे.

# विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य ची जिल्हास्तरावर निवड

तभा वृत्तसेवा

पैठण दि २३ :- तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य प्रा. विद्यामंदिर, पैठण ने राखली यशाची परंपरा कायम.

मानसिंग भाऊ पवार महाविद्यालय ढोरकीन येथे ५२व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक विभागातील ४६ शाळांनी सहभाग नोंदवला होता.त्यामध्ये आर्य चाणक्य प्रा. विद्या मंदिर पैठणने आरोग्य या विषयान्तर्गत आर्या इंनोवटीव्ह मल्टि ब्लॅक बोर्ड हा प्रोजेक्ट बनवला. विद्यार्थ्यांच्या दृष्टी दोष दूर करण्यासाठी विदयार्थी व शिक्षक यांना आवश्यक असल्या कारणाने त्या दृष्टीक्षेपात एक पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला आहे.अशा समाजउपयोगी प्रयोगाचे सर्वांकडून कौतुक होत आहे. विषयतज्ञ बाळकृष्ण मुळे व शिवाजी राठोड यांच्या शुभहस्ते विदयार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई चे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य,सह कार्यवाह चंद्रकांत मुळे,स्था. व्य. स.अध्यक्ष पद्मकुमार कासलीवाल ,कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, केंद्रीय सदस्य विजय चाटूपळे, शालेय व्य.स. अध्यक्ष शिवाजी मारवाडी, डॉ. राम लोंढे, डॉ. जयंत जोशी, डॉ अशोक पल्लोड , नंदकिशोर मालाणी, किशोर भाकरे, मु. अ. भास्कर कुलकर्णी मु. अ. ज्योती जोशी; आदींनी या प्रयोगाचे यशस्वी सादरीकरणाऱ्या विद्यार्थी, साद अंबेकर, आरुष कुलकर्णी, मार्गदर्शक शिक्षक-सर्फराज अंबेकर, मनोज शिंगारे यांचे अभिनंदन केले.



**वाळूज महानगर परिसरात अचानक मोकाट कुत्र्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. ही कुत्री इतर ठिकाणाहून एमआयडीसीमध्ये आणून सोडण्याची शक्यता नाकारता येत नाही. छाया : संजय निकम**

# 'उस्ताद' झाकीर हुसेन यांना ७३ वादकांच्या तबला वादनातून अनोखी श्रद्धांजली!

सभागृह मंत्रमुग्ध

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने रविवारी, २२ डिसेंबर रोजी आयोजित 'उस्ताद झाकीर हुसेन यांना ७३ वादकांच्या तबला वादनातून श्रद्धांजली'' या विशेष कार्यक्रमाला संगीतप्रेमींचा उदंड प्रतिसाद लाभला.

तापडिया नाट्य मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात ७३ वादकांनी एकत्रित तबला वादनाद्वारे उस्ताद झाकीर हुसेन यांच्या संगीत परंपरेला अनोखी श्रद्धांजली अर्पण केली. तबल्याच्या सुरेल थापांनी संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख आयोजक राजेश मुंढे यांनी उस्ताद झाकीर हुसेन यांच्या योगदानाचा गौरव करत, त्यांच्या कार्यातून भारतीय संगीताला मिळालेल्या उंचीचे वर्णन केले.

मंचावर ५ तबला वादक मुलींसह ७३ जणांच्या एकत्रित तबला वादनाने सभागृह दणाणून सोडले. त्यानंतर रुद्र केचे, चाणक्य दांडगे, गणेश डोळे, दिनेश डोळे, ईशान डोळे आणि सई बाराबोटे यांनी प्रत्येकी तिनताल एकल तबला वादन करून झाकीर हुसेन यांना श्रद्धांनाली अर्पण केली.

सभागृहात येतानाच बाहेर अत्यंत सुंदर रांगोळीतून राजेंद्र वाळके यांनी झाकीर हुसेन यांचे चित्र रेखाटले होते. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या संगीतप्रेमींनी ही सांगीतिक मेजवानी अनुभवताना उस्ताद झाकीर हुसेन यांची आठवण जागवत, त्यांच्या संगीताचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

सर्व उपस्थितांनी कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे आणि कलाकारांचे कौतुक करत अशा सांगीतिक कार्यक्रमांची परंपरा पुढे सुरू राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. याप्रसंगी काँग्रेसचे ड. सय्यद अक्रम, अफजल कादरी, फुजैल खान, अण्णा वैद्य, सारंग टाकळकर, सुप्रसिद्ध गायक सचिन नेवपूरकर, सुप्रसिद्ध उद्योजक राजेश उघडे यांची उपस्थिती होती. सर्व तबला वादक विद्यार्थ्यांच्या एकत्रीकरणासाठी प्रशांत बाराबोटे यांनी मोलाची भूमिका बजावली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश अचिंतलवार, योगेश वगदे, राहुल पाटील, सिद्धार्थ मोकळे, ओम बोटवे, योगेश बहादुरे, रोहित बनकर यांनी सहकार्य केले.